RNI : MAHMAR/2022/88796 Postal Regi.No:AMT/RNP/582/2026-2028
vidarbhkesari21@gmail.com www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

अमरावती, गुरुवार, १४ ऑक्टोबर २०२६ * वर्ष ६ * अंक १७१ * पृष्ठ : ६ * मूल्य रु. ३

## 'किंग' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला



शाहरुख खान यांचा 'किंग' हा चित्रपट (King) यंदा डिसेंबरमध्ये मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. याचदरम्यान, ज्येष्ठ ट्रेड विश्लेषक तरण आदर्श (Taran Aadarsh) यांनी शाहरुख खान यांचे स्टारडम आणि चित्रपट दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांच्या जोडीबद्दल आपले मत व्यक्त केले आहे. दूरदृष्टी असलेले दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला, शाहरुख खान अभिनीत बहुप्रतीक्षित आणि ॲक्शनने भरलेला 'किंग' हा चित्रपट सुपरस्टारच्या नेतृत्वाखालील दमदार कलाकारांच्या संचासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## सक्षिप्त



### भटक्या विमूक्तांना एक रुपयात घरकुल!

**मुंबई :** पालावर आणि तात्पुरत्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या भटक्या-विमुक्त समाजाच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नाममात्र एक रुपयात जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या प्रस्तावाला गती देऊन तो तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर करावा, तसेच जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणांसाठी पर्यायी जागांचे प्रस्ताव २९ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आदेश त्यांनी दिले. बैठकीतील सूचनांची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई होत असल्याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली.

### पन्नास जागांना मंजूरी

**मुंबई :** महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने पुण्याच्या ईएसआयसी (ESIC) मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालयाला औपचारिक मान्यता दिली आहे. या महाविद्यालयात एमबीबीएसच्या तब्बल 50 नवीन जागा उपलब्ध होणार असून, यामुळे राज्यातील वैद्यकीय शिक्षणाच्या संधींमध्ये मोठी वाढ होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. शैक्षणिक वर्ष 2027-28 पासून या नवीन जागा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या जातील. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे महाराष्ट्रातील हजारो गुणवंत विद्यार्थ्यांना डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करणे अधिक सुलभ होणार आहे.

### जयपूर एयरपोर्टवर आपत्कालीन लँडिंग

**दिल्ली :** जर्मनीच्या फ्रेंकफर्ट येथून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचे जयपूर एयरपोर्टवर आपत्कालीन लँडिंग करावे लागले. विमान हायजॅक होणार असल्याची पूर्वसूचना मिळाल्यानंतर हे लँडिंग करण्यात आले. सुरक्षा अभिकरणांनी तपास केल्यानंतर ही गोष्ट अफवा असल्याचे समजले. एअर इंडियाच्या फ्लाईट AI 2030 च्या संदर्भात अहमदाबाद आणि ट्राफिक एटीसीला सकाळी आपत्कालीन अलर्ट मिळाला होता.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा; दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५

◆ विदर्भ केसरी

**मुंबई, ता. १४ : दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात दिवाळीपूर्वी पैसे मिळावेत, यासाठी राज्य सरकार प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत म्हणून जमा करणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून दुष्काळी मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण असल्याने राज्य सरकारने हा पर्यायी निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ करण्यात आली असून, दुष्काळ निवारणासाठीच्या १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.**

### कर्ज, वीजबिलासाठी वसुलीचा तगादा लावल्यास कारवाई

■ **दुष्काळाच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. काही जण अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करतात; असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशाराही फडणवीस यांनी दिला. खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करून त्यांनीही कर्जवसुलीसाठी बळजबरीचे मार्ग वापरू नयेत, यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांकडून वीजबिल वसुलीसाठी तगादा लावला जात नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांचे वीजबिल सरकार भरत असून, मागील थकबाकीसाठीही वसुलीचा तगादा लावला जात नाही. एखाद्या ठिकाणी कोणी अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करत असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.**



### सरसकट शैक्षणिक शुल्कमाफी लागू

■ **शैक्षणिक शुल्कमाफीसंदर्भात यापूर्वी काढलेल्या शासन निर्णयात १९९२ पासूनच्या काही अटींचा समावेश असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. मंत्रिमंडळाने या अटी काढून टाकण्याचा निर्णय घेतला असून, शुल्कमाफीचा निर्णय आता सरसकट लागू करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा आणि सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. यापूर्वी राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या तक्रारींची दखल घेत 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' या दोन्ही निकषांचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करून एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना १२ सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

गेल्या २५ वर्षांच्या नोंदी पाहिल्यास राज्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जात असे आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये मदत दिली जात असे. यंदा मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ आधीच जाहीर करण्यात आला आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला. बुधवारी पूरक शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र, केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी कायद्यानुसार ठरवलेले टप्पे आणि कालमर्यादा पूर्ण करावी लागते. त्यामुळे ही प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.साडेतीन लाख शेतकऱ्यांची कर्जमाफीची यादी प्रमाणित

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया थांबलेली नसून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचे काम सुरू आहे. नव्याने आणखी साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली असून, या यादीतील शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे देण्यास सुरुवात होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय हा कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून स्वतंत्र असून, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार देणे हा त्यामागील उद्देश आहे.

**टँकरचा 'जीपीएस'द्वारे मागोवा**

दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असल्याने टँकरची संख्या वाढवण्यात येत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी जमिनीपासून तीन मीटरपेक्षा खाली गेली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासूनच टँकर सुरू करावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांचे जीपीएसच्या मदतीने मागोवा घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पिण्यासाठी पाणी राखून ठेवता यावे, यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेतून पाणी घेतल्या जाणाऱ्या सुमारे १६ हजार अवैध जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी अवैधरीत्या पाणी उपसा केल्यास त्याची जोडणी तोडण्यात येईल. हा निर्णय कठोर वाटू शकतो; मात्र दुष्काळी परिस्थितीत नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याने तो घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# अंगणवाडी सेविका व मदतनीसांना दिवाळीपूर्वीच भाऊबीज

### मंत्री अदिती तटकरे यांची घोषणा

मुंबई : राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

राज्यात १ लाख ८ हजार ६२७ अंगणवाडी सेविका आणि १ लाख ५ हजार ४७० अंगणवाडी मदतनीस अशी एकूण २ लाख १४ हजार ९७ पदे कार्यरत आहेत. या सर्व कार्यरत अंगणवाडी



सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

### नदीत बुडून युवकाचा मृत्यू

नागपूर, ता. १४ : : वर्धा धाम नदीत महिनाभराच्या कालावधीत दुसऱ्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सिंदी (मेघे) येथील कुणाल भारत मडावी (वय २६) याचा मृतदेह बुधवारी (ता. १४) सकाळी आश्रमाकडे जाणाऱ्या पुलाखाली आढळून आला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, धाम नदी परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कुणाल मडावी मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास 'दहा मिनिटांत येतो,' असे घरच्यांना सांगून बाहेर पडला होता.

# विद्यार्थ्यांसाठी खास संधी

◆ विदर्भ केसरी

**दिल्ली, ता. १४ :** मानवाधिकार आयोगाने आपल्या हिवाळी इंटर्नशिप प्रोग्रॅम २०२६ साठी अर्ज मागवले आहेत. ही इंटर्नशिप चार आठवड्यांच्या कालावधीची असून १४ डिसेंबर २०२६ ते ०८ जानेवारी २०२७ या कालावधीत दिल्ली येथे पार पडेल. तसेच इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना १२,००० रुपयांचे विद्यवेतन देण्यात येईल. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग या इंटर्नशिपसाठी १०० विद्यार्थ्यांची निवड करेल. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज १५ ऑक्टोबर २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सादर करणं आवश्यक आहे.

### असा कराल अर्ज

■ **पात्र विद्यार्थी अधिसूचना आणि अर्ज प्रक्रिया तपासण्यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या nhrc.nic.in या अधिकृत वेबसाईटला भेट देऊ शकतात. उमेदवारांनी २५० शब्दांचे निवेदन तयार करावे आणि त्यांच्या शैक्षणिक संस्थेकडून शिफारसपत्र सादर करावे. अर्ज करण्यापूर्वी त्यांनी सर्व पात्रता अटी आणि आवश्यक कागदपत्रे तपासावीत.**

इंटर्नशिपमध्ये काय शिकता येईल?

विद्यर्थ्यांना या इंटर्नशिपच्या माध्यमातून मानवाधिकार समस्या, आयोगाचे कार्य आणि भारतातील मानवाधिकारांशी संबंधित कायदे व धोरणांबद्दल जाणून घेण्याची संधी मिळेल. दिल्लीबाहेरून प्रवास करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना अधिकृत सूचनेत नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून, त्यांच्या येण्या जाण्याच्या प्रवासासाठी स्लीपर वातानुकूलित थ्री टियर रेल्वेचे भाडे देखील मिळेल. तसेच इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना १२,००० रुपये विद्यावेतन दिले जाईल.

# खाडीतील पाण्यात बुडून चार मुलांचा मृत्यू

◆ विदर्भ केसरी, ता. १४

रत्नागिरी : जिल्ह्यातील राजापूर (Ratnagiri) तालुक्यात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून 4 मुलांचा पाण्यात (Sunk) बुडून मृत्यू झाल्याची माहिती आहे. राजापूरच्या नाणार गावातील इंगळवाडी येथे खाडीत आईसोबत कालवे काढण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा बुडून मृत्यू झाला. त्यापैकी एक मृतदेह अद्यापही सापडला नाही. या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी पोलीस दलातर्फे तटरक्षक दलाच्या मदतीने आज दिवसभर शोध मोहीम राबवले गेले. मात्र, या मन हेलावणाऱ्या घटनेनं अख्ख्या गावावर शोककळा पसरली आहे.

नाणार येथील इंगळवाडी परिसरात राहणारे जुनेद भाटकर यांच्या पत्नी हिना भाटकर आपल्या मुलांसह दुपारी साडेतीनच्या सुमारास खाडीमध्ये मुळे आणि कालवे काढण्यासाठी गेल्या होत्या. आई-वडील खाडीपात्रात कालवे काढत असताना मुले पाण्याजवळ होती. दरम्यान, सायंकाळी साडेचारच्या सुमारास खाडीपात्रातील खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने पाचही मुले एकापाठोपाठ पाण्यात बुडू लागली. या दुर्घटनेत बुडालेली सर्व मुले 4 ते 15 वयाची असल्याची माहिती आहे. सुदैवाने दुर्घटनेत एका मुलीला वाचविण्यात यश आलं.

# राष्ट्रीय क्विझमध्ये महाराष्ट्राच्या श्रीया उगले यांचे विजेतपद!

## देशभरातील १२ हजार ८४५ स्पर्धकांचा सहभाग

◆ तौसिफ शेख/ विदर्भ केसरी

पांढरकवडा, ता. १४ : भारत सरकारच्या केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या वतीने मंत्रालयाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेत महाराष्ट्राच्या श्रीया योगेश उगले यांनी विजेतेपद पटकावून राज्याचा गौरव वाढविला आहे. देशभरातील तब्बल १२ हजार ८४५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविलेल्या या स्पर्धेत श्रीया यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय ठरले असून,त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या (Ministry of Earth Sciences – MoES) वतीने 'MoES Foundation Day Quiz – Advancing Earth Sciences, Empowering the Nation' या संकल्पनेवर आधारित ही राष्ट्रीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. पृथ्वी विज्ञान क्षेत्रातील वैज्ञानिक उत्कृष्टता आणि जनसेवेची २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.विज्ञानाविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे,पृथ्वी विज्ञानाशी संबंधित विषयांचे ज्ञान वाढविणे आणि मंत्रालयाच्या वैज्ञानिक कार्याची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे,हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश होता.

या प्रश्नमंजुषेत हवामान व हवामानबदलविषयक सेवा,महासागर विज्ञान,ध्रुवीय प्रदेशांतील संशोधन, भूकंपशास्त्र, सागरी खोल भागातील संशोधन तसेच पृथ्वी प्रणाली विज्ञान अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला होता.या विषयांवरील स्पर्धकांच्या ज्ञानाची चाचणी घेण्यासोबतच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यावरही भर देण्यात आला.देशाच्या विविध भागांतून एकूण १२ हजार ८४५ स्पर्धकांनी या प्रश्नमंजुषेत सहभाग घेतला.

त्यातून निवडण्यात आलेल्या तीन विजेत्यांमध्ये महाराष्ट्राच्या श्रीया योगेश उगले यांनी स्थान मिळवत विजेतेपद पटकाविले. आसामचे राहुल दास आणि पश्चिम बंगालचे अरुण कर हे अन्य दोन विजेते ठरले. विविध राज्यांतील स्पर्धकांशी स्पर्धा करत श्रीया यांनी मिळविलेले यश महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद मानले जात आहे.

### ◆ विज्ञान जागृतीतून विकसित भारताचे ध्येय



**विज्ञान आणि संशोधन हे देशाच्या प्रगतीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय संकल्पनेच्या पूर्ततेसाठी वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करणे, तसेच नागरिकांना पृथ्वी विज्ञानाच्या विविध पैलूंची ओळख करून देणे, हा या उपक्रमाचा व्यापक हेतू होता.अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये वैज्ञानिक विषयांविषयी कुतूहल निर्माण होऊन ज्ञानवृद्धीला चालना मिळते.पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने या स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले असून,सहभागी झालेल्या नागरिकांचेही आभार मानले आहेत. महाराष्ट्राच्या श्रीया योगेश उगले यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

# 'वाईल्ड बर्ड डे'; ९५ पक्षी प्रजातींची नोंद

## विविध अधिवासांत पक्षी सर्वेक्षण; दुर्मिळ, स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन

◆ विदर्भ केसरी :

नागपूर, ता. १४ : जागतिक स्तरावर आयोजित 'वाईल्ड बर्ड डे' या उपक्रमानिमित्त जिल्ह्यात दिवसभर पक्षी सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात एकूण ९५ पक्षी प्रजातींची नोंद घेऊन त्यांची माहिती आंतरराष्ट्रीय स्तरावर पक्षी निरीक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या ई-बर्ड या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली. या उपक्रमात पक्षी अभ्यासक राहुल वकारे यांनी सहभाग नोंदविला.

या जागतिक पक्षीनिरीक्षण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील नवीन मोहन नगर, येळाकेळी, जामणी, मदन धरण, बोरखेडी तलाव, माळेगाव ठेका, आमगाव (जंगली), रायपूर (जंगली), रिधोरा धरण, सोंडी, सालई



(पेवठ) आणि बोरधरण अशा विविध ठिकाणी पक्षी सर्वेक्षण करण्यात आले. तलाव, धरण परिसर, शेतीक्षेत्र, गवताळ प्रदेश आणि वृक्षाच्छादित भाग अशा विविध अधिवासांत आढळणाऱ्या पक्ष्यांची नोंद घेण्यात आली. या सर्वेक्षणामुळे जिल्ह्यातील पक्षीवैविध्याची माहिती संकलित करण्यास तसेच स्थानिक आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या उपस्थितीचा अभ्यास करण्यास मदत झाली. या सर्वेक्षणात जागतिक निसर्ग संवर्धन संघटनेच्या लाल यादीतील संवर्धन स्थितीनुसार विविध श्रेणींत समाविष्ट पक्ष्यांची नोंद झाली. त्यामध्ये असुरक्षित श्रेणीतील नदी सुरय (रिव्हर टर्न) आणि संकटसमीप श्रेणीतील भारतीय नीलपंख (इंडियन रोलर), तांबूस-शेपटीचा चंडोल (रुफस-टेल्ड लार्क) आणि पांढऱ्या मानेचा करकोचा (एशियन वूली-नेक्ड स्टॉर्क) या पक्ष्यांचा समावेश आहे. याशिवाय युरेशियन चिमणमार ससाणा (युरेशियन स्पॅरोहॉक), पांढऱ्या डोळ्यांचा गरुड (व्हाइट-आयड बझार्ड), कापशी घार (ब्लॅक-विंग्ड काइट), रंगीत करकोचा (पेंटेड स्टॉर्क), राखी बगळा (ग्रे हेरॉन), नकटा अशा वैशिष्ट्यपूर्ण पक्ष्यांचेही दर्शन झाले.

### हिवाळी पाहुण्यांचे आगमन

■ **हिवाळी स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर तपकिरी खाटिक (ब्राऊन श्राईक), लाल पुठ्ठ्याची भिंगरी (ईस्टर्न रेड-रम्प्ड स्वॅलो), रेषाळ कंठाची भिंगरी (स्ट्रीक-थ्रोटेड स्वॅलो), काळा थिरथिरा (ब्लॅक रेडस्टार्ट) आणि हिरवट वटवट्या (ग्रीनिश वॉब्लर) अशा स्थलांतरित पक्ष्यांचीही नोंद करण्यात आली. भारत हा अनेक स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रवासातील महत्त्वाचा मार्ग आहे. मध्य आणि पूर्व आशियातील प्रजनन क्षेत्रांतून आफ्रिकेतील हिवाळी अधिवासांकडे जाणारे काही पक्षी शरद ऋतू आणि वसंत ऋतूत भारतातून प्रवास करतात. अशा पक्ष्यांना 'पॅसेज मायग्रंट्स' (प्रवासादरम्यान स्थलांतर करणारे पक्षी) असे म्हटले जाते. या गटातील युरोपियन नीलपंख (युरोपियन रोलर) आणि सामान्य कोकीळ (कॉमन कुकू) या वैशिष्ट्यपूर्ण पक्ष्यांचीही नोंद या सर्वेक्षणात झाली.**

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, 15 ऑक्टोबर 2026



## संपादकीय

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंडेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं-उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप-परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंडे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा निःस्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल. मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या-मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी-न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वर्तुळात नेहमीच नाराजी असते. राज्यातले बाकी सगळे अधिकारी तडजोडी आणि दबावाखाली सहज झुकणारे असून मुंडे तेवढे निःस्पृह, निर्भय आणि निष्पक्ष असल्याचं चित्र निर्माण होतं, असा या वर्तुळाचा आक्षेप असतो. लिखित कायद्याव्यतिरिक्तही वस्तुस्थिती असते. अधिकारांचा वापर करताना तिचा सारासार विचार करावा लागतो. व्यवहार्यता लक्षात घ्यावी लागते. तरच कायद्याची विवेकी अंमलबजावणी शक्य होते, असं या अधिकाऱ्यांचं म्हणणं असतं. मुंडे यांचा कामाचा वेग आणि धडाका यामुळे ते ज्या विभागात जातात, तिथे अचानक कामाचा ताण येतोच; पण त्याहीपेक्षा वेगळ्या कार्यशैलीने कर्मचारी, कनिष्ठ अधिकारी वर्गात आहे बैचेनी पसरते. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या छत्रपती संभाजी नगर येथील चाचणी प्रयोग शाळेतील कर्मचाऱ्यांनी अशाच मुद्द्यावरून तक्रार केली आहे. सरकारी कामात पाळ्यांनुसार, अधिक काम कसं येतं? असा प्रश्न त्यांना पडला आहे. मंत्री म्हणून या विभागाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते नरहरी झिरवळही मुंढे यांच्या एककल्ली, धडक मोहिमांवर खूश नाहीत. त्यांचंही काही दुःख आहेच. हे सगळं प्रकरण त्यामुळे येत्या काही दिवसांत मुख्यमंत्र्यांसमोर जाण्याची शक्यता दिसते आहे. मुंढे यांच्या कार्यशैलीबद्दल आक्षेप असले, तरी त्यांच्या 'दे धडक' पणामुळेच एरवी ज्याला हात लागला नसता, अशा कारवाया होतात हेही खरंच आहे. देशातलं दुधाचं एकूण उत्पादन, त्याचा विविध कारणांसाठी होणारा वापर आणि बाजारातील पनीरची उपलब्धता याचं गणित जुळत नाही, अशी चर्चा अनेक जण करत होते. पण, दूध भेसळीला हात घातला मुंढे यांनीच. मिठाईतली भेसळ, फळांना चढणारे कृत्रिम, घातक रंग आणि मेणाचे थर, पाकिटावर दिलेली माहिती आणि आतील पदार्थांतील तफावत, जागोजागी अस्वच्छता आणि बेफिकिरी-या सगळ्याला मुंढे यांनीच हात घातला आहे. सामान्य माणसाला ते खूप आश्वासक वाटतं. धाडी आणि त्याच्या बातम्या ही एक बाजू आहे आणि आरोपांची सिद्धता, कारवाईची वैधता ही दुसरी बाजू. या दुसऱ्या बाजूला सुरुवात होण्यापूर्वीच मुंढे यांची बदली झाली, तर नंतर हे सगळं निस्तरायचं कोणी? असा प्रश्न त्या विभागातल्या अधिकाऱ्यांना पडला आहे. तोही खराच आहे.

– संपादक

# काय भुललासी वरलिया रंगा...

"अग आई ! पण सगळेच अशी, म्हणजे तुझ्या भाषेत फाटलेली जीन्स घालतात. सद्या ट्रेण्ड आहे असा." माझी मुलगी मला समजावून सांगत होती. खरंच कधी काळी परिस्थिती नाही, सद्या विकत घेणे जमणार नाही, अशा अनेक कारणांनी फाटलेला ड्रेस शिवून घालणे किंवा चार लोकांना दिसू नये म्हणून फाटलेला भाग लपविण्याची कसरत करावी लागत असे. मात्र जो फाटलेपणा गरिबी दर्शवायचा तोच फाटलेपणा आजचा ट्रेण्ड होईल, श्रीमंतीचे लक्षण होईल आणि मी ते याची डोळा याची देही बघील असे कधीच वाटलं नव्हतं.



आज ट्रेण्ड , फॅशन म्हणून आपण भरकटू लागलो आहे का? किंवा आज आम्ही अशा समाजाचे प्रतिनिधित्व करतो की, जिथे वरच्या रंगालाच अती महत्त्व दिल्या जाते आणि आतील निर्मळपणा दुर्लक्षित केल्या जातो.

'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ' अशी बरीच उदाहरण आपल्या देशात आहेत. अगदी महात्मा गांधीपासून ते सुधा मुर्तीपर्यंत. आपापल्या क्षेत्रात त्यांनी आपल्या नावाचा ठसा उमटविला आहे. मात्र तरीही फाटक्या कपड्यांचा ट्रेण्ड यावा. तरुण वर्गाने निश्चितच आपला आदर्श तपासून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. चित्रविचित्र पेहराव करणारे स्टार्स जर तुमचे आदर्श असेल आणि तुम्ही त्यांच्यासारखे कपडे घालून ते दर्शवित असाल तर ते चुकीचे आहे. कारण तुम्ही फक्त वरवर त्यांना आदर्श मानताय. त्यांची जिद्द, चिकाटी, काम करण्यासाठी मेहनत घेण्याची तयारी, खूप कष्टाने त्यांनी मिळविलेली तुमच्या आदर्शाची जागा या सर्व गोष्टी तुमच्या दृष्टीआड होत आहेत. हे खर तर समाजाच्या अधःपतनाचे लक्षण आहे.



'आय डेअर' हे किरण बेदी यांचे आत्मचरित्र वाचताना 'पोशाख हा व्यक्तिगत निवड व वृत्तीचं प्रतिबिंब असते' या वाक्याने माझं लक्ष वेधले.आपल्या पोशाखातून आपली निवड व वृत्ती दिसते. आपला पेहराव आपल्या संस्कृतीचा सोबतच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा देखील भाग असतो. मला प्रकाश अय्यर यांचे 'द हॅबीट ऑफ विनिंग' या पुस्तकातील उदाहरण आठवते.

लेखक एकदा गाड्यांच्या शोरूम मध्ये बसून होते.थोड्या वेळाने टॅक्सी मधून एक जोडपं उतरले आणि शोरूम मध्ये आले.सूट बूट मधील नवरा आणि जीन्स टॉप मधील बायको. येताच शोरूम मध्ये वेगळाच उत्साह दिसला. आत त्यांना सोप्यावर बसवून कॉफी लगेच देण्यात आली. आणि वेगवेगळ्या मॉडेलचे माहिती त्यांना सांगण्यात विक्रेते गर्क झाले.

पुढे लेखक म्हणतात,मी विचार करीत होतो की, एखादा धोतर आणि नऊवारी घातलेले जोडपं जर या शोरूम मध्ये आले तर त्यांना अशीच ट्रीटमेंट मिळत असेल का? न राहून मी तेथील मॅनेजरला विचारले, " तुम्ही अशीच ट्रीटमेंट एखाद्या रिक्षाने, सायकलने किंवा पायी येणाऱ्या धोतर किंवा साधा पोशाख परिधान करणाऱ्या माणसाला देता का?

तेव्हा मॅनेजर म्हणाला, तुम्ही खूपच छान प्रश्न केला. साधे पोशाख घातलेला मनुष्य गाडी घेऊ शकत नाही अशीच भावना पहिले आमचीही होती. असे लोक आले की आम्ही त्यांना जास्त भाव देत नव्हतो.पण पोषाखावरून अंदाज बांधू नये हे आम्ही त्या दिवशी शिकलो जेव्हा एका धोतर व बंगाली घातलेल्या साध्या शेतकरी माणसाने आपल्या खिशातून नोटांचे बंडल काढून नगदी गाडी विकत घेतली. आणि हे सूट बुटातील गाडी घ्यायलाच येईल असे नसते. यांना एशी मध्ये बसून ऊन टाळायची असते सोबतच कॉफी ही प्यायची असते. असाही अनुभव आला आहे.

एकदा रंग बेरंगी फुगे आकाशात सोडणाऱ्या माणसाला एक निरागस मुलाने प्रश्न केला.

"काका तुम्ही लाल ,हिरवा, पिवळा, गुलाबी रंगाचे फुगे आकाशात सोडले मग तुमच्या हातातील हा पांढरा फुगा पण वर जाईल का?" तेव्हा त्या फुगेवाल्याने दिलेले उत्तर मला सर्वोत्तम वाटले. "मुला, रंगावर काहीही नसते फुगे वर जातात ते आत असलेल्या हवेमुळे."

खरंच ऊर्जा आतून असली पाहिजे. तुमच्या दिसण्यापेक्षा तुमचं असणं महत्त्वाचं!

**-प्रांजली गोसावी डाखोरे**
**हिंगणघाट 9545373236**
(लेखिका संशोधन अभ्यासक आहेत.)

## आदिशक्तीची खरी पूजा: एक आर्त साद आणि आत्मचिंतन

**नमन जगज्जननीच्या आदिशक्तीला...**

मी नास्तिक नाही. माझं हृदय ईश्वराच्या अस्तित्वाने आणि मातेच्या अपार श्रद्धेने भरलेलं आहे. पण आज जेव्हा सभोवतालचं वास्तव पाहतो, तेव्हा मन विषण्ण होतं आणि मनात उठलेलं वादळ मला गप्प बसू देत नाही...

कधी विचार केलाय आपण, आपण नक्की कुणाला खूश करण्यासाठी हे प्रदर्शन करतोय? आज निसर्गाने पाठ फिरवली आहे. आपल्या शेतात राबणारा बळीराजा, जो संपूर्ण जगाचा पोशिंदा आहे, तो कोरड्या पडलेल्या ढगांकडे डोळ्यात प्राण आणून पाहातोय. दुष्काळाचं भीषण सावट आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत येऊन ठेपलंय. येत्या काळात घोटभर पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावं लागणार आहे. आजूबाजूला डोळसपणे पाहिलं, तर कितीतरी घरांमध्ये चुली पेटलेल्या नाहीत, कित्येक निष्पाप डोळ्यांत उपासमारीची आणि लाचारीची आसवं आहेत. अशा भीषण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर, लाखो रुपयांची क्षणभंगुर आतिशबाजी करताना आपल्या काळजाला एकदाही पीळ पडू नये? एका रात्रीत हवेत उडून जाणाऱ्या त्या पैशांच्या धुरामध्ये एखाद्या गरीब शेतकऱ्याचं आयुष्य, एखाद्या भुकेल्या बालकाचं अन्न आणि एखाद्या बहिणीचं भविष्य सावरता आलं नसतं का? हे शक्तिप्रदर्शन आपण कुणाला दाखवत आहोत? जगज्जननी भवानी मातेला दिखावा आवडतो की निस्वार्थ सेवा? महाप्रसादाच्या आणि भंडाऱ्यांच्या नावाने आज ठिकठिकाणी अन्नाची नासाडी होते. शेकडो प्लेट्स कचऱ्याच्या पेटीत जातात, आणि दुसरीकडे त्याच कचऱ्याजवळ एखादी भुकेली माय पोटाची आग विझवण्यासाठी अन्नाचा कण शोधत असते... अन्न हे पूर्णब्रह्म आहे, मग अन्नाची ही अवहेलना करून आपण मातेचा आशीर्वाद कसा मागू शकतो? स्त्रीशक्तीचा सन्मान: नऊ दिवसांचे नाटक की ३६५ दिवसांची निष्ठा? मंडपात देवीची मूर्ती बसवून तिला ५६ भोगे दाखवायचे, नऊ दिवस मुलींचे पाय धुवून पूजा करायची; आणि उरलेले ३६५ दिवस घरातल्या आई-बहिणीला तुच्छ लेखायचं, वृद्धाश्रमात मायबापाला सोडायचं, रस्त्यावरून जाणाऱ्या स्त्रीकडे वाकड्या नजरेने पाहायचं... ही मातेची भक्ती असूच शकत नाही! ज्या दिवशी आपल्या घरातील स्त्रीचा डोळ्यांत अश्रू येणार नाहीत, ज्या दिवशी प्रत्येक आईला घरात देवतेसारखं स्थान मिळेल, ज्या दिवशी प्रत्येक मुलीला मोकळा श्वास घेता येईल आणि तिची सुरक्षितता अबाधित राहील—त्याच दिवशी खऱ्या अर्थाने मातेचा नवरात्रोत्सव साजरा होईल! आणि देणगीच्या नावाने होणारी जबरदस्ती? उत्सवाचा निधी हा श्रद्धेने आणि स्वखुशीने यायला हवा. कुणाच्या खिशाला, कुणाच्या स्वाभिमानाला पीळ देऊन गोळा केलेला पैसा मातेच्या चरणी कधीच स्वीकारला जात नाही. माझ्या बंधू-भगिनींनो, चला या नवरात्रीत एक नवा अध्याय लिहूया : या वर्षी फटाक्यांचा आवाज कमी करून भुकेल्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद वाढवूया. हजारो रुपयांचा डामडौल टाळून तो पैसा एखाद्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या मुलाच्या शिक्षणासाठी, गरिबांच्या औषधांसाठी किंवा पाण्याचा टंचाईग्रस्त भाग वाचवण्यासाठी वापरूया. हे जगज्जननी माते! आम्हा सर्वांचे अंधारलेले विचार दूर कर. आम्हाला देखाव्याची नाही, तर खऱ्या सेवाभावाची सद्बुद्धी दे!



**॥ जय माता दी ॥** **-विष्णू ज्ञानदेवराव लोडम**
प्रदेश महामंत्री अटल फाउंडेशन महा. राज्य

# निसर्गोपचार गौरव सन्मान सोहळा

◆ **विदर्भ केसरी प्रतिनिधी**

शेलुबाजार, ता. १४ : येथील सुप्रसिद्ध निसर्गोपचार योग तज्ज्ञ. दुर्गा ताई दुगाणे यांना त्यांच्या उल्लेखनीय निसर्गोपचार कार्याबद्दल "निसर्गोपचार गौरव सन्मान 2026" हा अतिशय प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला. दि. 4 ऑक्टोबर 2026, रविवार रोजी भातृमंडळ हॉल, बुलडाणा येथे आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व योगा निसर्गोपचार चिकित्सक असोसिएशन यांच्या वतीने हा भव्य सन्मान सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला.

निसर्गोपचार योग. क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत दुर्गाताई दुगाणे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हा गौरव प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्रातील शेकडो निसर्गोपचार तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे बुलडाणा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. श्री. संजयभाऊ गायकवाड, बुलडाणा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. पूजाताई गायकवाड, डॉ. सचिन सुपे, डॉ. त्रिदीप गुहा, डॉ. प्रशांत कपाले, एम.जी.एम. विद्यापीठाच्या योगा विभागाचे प्रमुख श्री. गंगाप्रसाद खरात. मंचावरील प्रमुख उपस्थिती आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे व्हाईस चेअरमन श्री. नितीनराजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे,सौ. दिशा चव्हाण, श्री. विजय नवल पाटील, श्री. विनोद ढोबळे, श्री. रावसाहेब घोडेगाव, श्री. राम



## आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन

**सेवाग्राम** : कासाबाई स्कूल ऑफ नर्सिंग येथे लायन्स मेडिकोज यांच्या वतीने हुमिनिटी सर्व्हीस विक अंतर्गत 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी लायन्स मोडिकोडचे अध्यक्ष विनायक ताकसांडे, सचिव डॉ. नलिनी गव्हाणे, खजिनदार डॉ. मंदिकिनी जवादे, डॉ. अजय माने, डॉ. प्रवीन धाकटे तसेच कासाबाई स्कूल ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या प्रा. प्रणिता गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आज ईएमई कोर डे चे भव्य आयोजन

## थडीचे माजी सैनिक धिरजराजे सातपुते यांचा होणार सन्मान

◆ **अक्षय गुर्जर**

**शिरसगाव कसबा, ता. १४** : भारतीय स्थलसेनेच्या ईएमई (इलेक्ट्रॉनिक्स अँड मेकॅनिकल इंजिनिअर्स) कोर डे २०२६ चे भव्य आयोजन गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी नागपूर रोड, राहाटगाव येथील जिजाऊ हॉल, अमरावती येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ईएमई कोरच्या माजी सैनिकांचा मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभाग राहणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून अकोला येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून, यंदा प्रथमच अमरावतीत हा सोहळा पार पडणार आहे.

ईएमई कोर भारतीय स्थलसेनेतील शस्त्रास्त्रे, रणगाडे, रडार, हेलिकॉप्टर आणि अन्य अत्याधुनिक लष्करी उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडते. 'कर्म ही धर्म' हे या कोरचे ब्रीदवाक्य असून, यंदा कोरच्या ८४ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ब्राह्मणवाडा थडी येथील माजी सैनिक धिरजराजे सातपुते यांचा सेवानिवृत्तीनंतरच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'वेटरन अचिव्हर पुरस्कार' मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच वीरमाता, वीरपत्नी आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचाही गौरव करण्यात येणार आहे. तसेच पत्रकार सागर सवळे, पत्रकार राजेश खडसे यांचाही सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला निवृत्त संचालक कर्नल सुहास जतकर, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रकाशभाऊ राऊत यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील ईएमई कोरच्या सर्व माजी सैनिकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# शेलुबाजारची आराध्य दैवत माँ सटवा आई

## लहान लेकरांच्या सुखी, निरोगी आयुष्यासाठी भाविकांचे श्रद्धास्थान

◆ **श्याम अपूर्वा**

**शेलुबाजार** : वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यात असलेल्या शेलुबाजार येथील माँ सटवा आई हे पंचक्रोशीतील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. लहान लेकरांची आई, बालकांचे कल्याण चिंतणारी आणि त्यांच्या सुखी आयुष्यासाठी प्रार्थना केली जाणारी देवी म्हणून माँ सटवा आईची विशेष ओळख आहे. शेलुबाजारची आराध्य दैवत असलेल्या माँ सटवा आईच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवाच्या काळात शेलुबाजारसह परिसरातील विविध गावांतून तसेच दूरदूरच्या ठिकाणांहून भाविक आपल्या मुलाबाळांसह येतात. मातेच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या लेकरांच्या सुखी, निरोगी आणि मंगलमय भविष्यासाठी प्रार्थना केली जाते.

नवरात्रोत्सवात माँ सटवा आईच्या दर्शनासाठी भाविकांची श्रद्धापूर्ण धाव

नवरात्रोत्सव हा आदिशक्तीच्या उपासनेचा, भक्तीचा आणि धार्मिक परंपरा जपण्याचा पवित्र सण मानला जातो. या नऊ दिवसांत भाविक विविध देवीदेवतांच्या मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेतात. दुर्गादेवी, महालक्ष्मी, सरस्वती माता, शारदा देवी तसेच विविध ग्रामदैवतांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. घराघरांत घटस्थापना, दुर्गापूजन, आरती आणि विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिभावाने साजरे केले जातात. याच भक्तिमय वातावरणात शेलुबाजार येथील माँ सटवा आईच्या दर्शनालाही विशेष महत्त्व आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने अनेक परिवार आपल्या लहान मुलांना सोबत घेऊन मातेच्या दर्शनासाठी येतात. मातेच्या चरणी माथा टेकवून आपल्या मुलांवर तिची कृपादृष्टी सदैव राहावी, कुटुंबात सुख-शांती नांदावी आणि जीवनात आनंद व समृद्धी लाभावी, अशी मनोभावे प्रार्थना केली जाते.

लहान लेकरांची आई म्हणून माँ सटवा आईची विशेष ओळख भारतीय संस्कृतीत बालकाचा जन्म हा प्रत्येक कुटुंबासाठी आनंदाचा आणि मंगलमय क्षण असतो. नवजात बालकाचे आयुष्य सुखी, निरोगी आणि दीर्घायुषी व्हावे, त्याच्या जीवनात कोणतेही संकट येऊ नये आणि त्याला उज्ज्वल भविष्य लाभावे, अशी प्रत्येक आई-वडिलांची मनापासून इच्छा असते. याच भावनेतून शेलुबाजार येथील माँ सटवा आईच्या चरणी नवजात बालकांसाठी प्रार्थना केली जाते. बाळाच्या जन्मानंतर त्याला सोबत घेऊन मातेचे दर्शन घेणे, तिच्या चरणी नतमस्तक होणे आणि बालकाच्या उत्तम आरोग्यासाठी व कल्याणासाठी आशीर्वाद मागणे, ही श्रद्धेची परंपरा अनेक भाविकांच्या मनात विशेष स्थान राखून आहे. माँ सटवा आई ही लहान लेकरांची रक्षणकर्ती असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे केवळ नवजात बालकेच नव्हे, तर वाढत्या वयातील मुलांच्या शिक्षणासाठी,



प्रगतीसाठी, उत्तम संस्कारांसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठीही भाविक मातेच्या चरणी प्रार्थना करतात.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

# मूर्तिजापूर-बोर्टा रस्ता बांधकामात प्रचंड भ्रष्टाचार

## निकृष्ट कामाची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी

◆ विदर्भ केसरी मूर्तिजापूर प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, ता. १४ : हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल योजनेअंतर्गत सुरू असलेल्या मूर्तीजापूर ते बोर्टा फाटा दरम्यानच्या रस्ता व पुलांच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला असून काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एका अर्जाद्वारे करण्यात आली आहे. रस्त्याचे काम संथ गतीने; अपघातात नागरिक जखमी**



अर्जात नमूद केल्यानुसार, मूर्तिजापूर ते बोर्टा दरम्यानचा रस्ता मागील दोन वर्षांपासून अत्यंत संथ गतीने आणि बेजबाबदारपणे बांधला जात आहे. बोर्टा ते हिवरा कोरडे हा रस्ता अर्धाच खोदून ठेवल्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले असून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांचे रस्ते बंद अन् मातीचा बेकायदेशीर वापर रस्त्याचे काम करताना परिसरातील शेतकऱ्यांचे शेतात जाणारे पारंपरिक हक्काचे वहीवाटीचे रस्ते बंद करण्यात आले आहेत. मागील दोन वर्षांपासून कोणतीही पर्यायी तरतूद न केल्याने शेतकरी वर्ग त्रस्त झाला आहे. याशिवाय, रस्ता तयार करताना नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या मोठ्या प्रमाणावर मातीचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे रस्त्याचा दर्जा कमालीचा खालावला आहे. पुलांचे बांधकामही कमकुवत या मार्गावर येणाऱ्या सर्व पुलांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट व कमकुवत दर्जाचे झाले असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या संपूर्ण गैरप्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. १९ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा रस्त्याचे व पुलांचे काम त्वरित दर्जेदारपणे पूर्ण करून ते वाहतुकीसाठी उपलब्ध करून द्यावे, तसेच या भ्रष्टाचारप्रकरणी जबाबदार कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कडक पारदर्शक कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी बोर्टा ग्रामपंचायतीचे सरपंच पंकज ओंकार सावळे यांनी केली आहे. योग्य ती कारवाई न झाल्यास स्थानिक ग्रामस्थांसह दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ पासून बोर्टा फाटा येथे आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. उपोषणादरम्यान होणाऱ्या परिणामांना प्रशासनच जबाबदार राहील, असेही त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. सदर निवेदनाच्या प्रतिलिपी अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे, मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे, जिल्हाधिकारी (अकोला), जिल्हा पोलीस अधीक्षक (अकोला), उपविभागीय अधिकारी मूर्तिजापूर,तहसीलदार मूर्तिजापूर तसेच मूर्तिजापूर शहर व माना पोलीस ठाण्याच्या ठाणेदारांना पाठवण्यात आल्या आहेत.

> "१५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८.00 वाजेच्या सुमारास याच मार्गावर माझा अपघात झाला. अकोल्यातील खाजगी रुग्णालयात लाखो रुपये खर्च करून उपचार करावे लागले, तरीही या अपघातामुळे मला अपंगत्व आले आहे. या संपूर्ण घटनेला संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीच जबाबदार आहे. आमच्या उपचाराचा सर्व खर्च कंपनीने भरून द्यावा, अन्यथा गावातील सर्व महिला सरपंच पंकज सावळे यांच्यासोबत आमरण उपोषणाला बसतील."
>
> **-प्रतिक्षा मनिष उघडे**
> (अपघातग्रस्त पीडित)

# प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्यालाच विधानपरिषदेत पाठवा!

## शिक्षकांचे आवाहन : शिक्षक मतदारसंघ निवडणूक

◆ **प्रा. एल डी सरोदे**

अमरावती, ता. १४ : अमरावती विभागाच्या शिक्षक मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणूक २०२६ ची रणधुमाळी सध्या जोरात सुरू आहे.

राजकीय वातावरण तापू लागले असून उमेदवारांकडून शिक्षकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. मात्र, या पार्श्वभूमीवर अमरावती विभागातील सूज्ञ शिक्षक आणि शैक्षणिक वर्गातून एक अत्यंत महत्त्वाचा व रोखठोक सूर उमटत आहे "गुरूजनांनो, ही निवडणूक म्हणजे केवळ जेवणावळी आणि भेटवस्तूंचा 'इव्हेंट' बनू देऊ नका!" आपल्या प्रलंबित प्रश्नांसाठी रस्त्यावर व सभागृहात संघर्ष करणाऱ्या योग्य आणि अभ्यासू उमेदवारालाच मत देऊन विधानपरिषदेत पाठवावे, अशी तीव्र भावना आज विभागातील शिक्षकांमध्ये पाहायला मिळत आहे. शिक्षकांचे ज्वलंत प्रश्न अजूनही अनुत्तरित! गेल्या अनेक वर्षांपासून अमरावती विभागातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे अनेक मूलभूत प्रश्न धोरणात्मक निर्णय न झाल्यामुळे प्रलंबित आहेत. भावी पिढी घडवणाऱ्या शिक्षकांनाच आज आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागत आहे. शिक्षकांच्या प्रमुख मागण्या १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू न झाल्यामुळे त्यांच्या भविष्याची आणि सामाजिक सुरक्षेची मोठी अडचण निर्माण झाली आहे. वाढत्या महागाईच्या काळात निवृत्तीनंतरचे भविष्य अंधकारमय वाटत असून 'ओपीएस' हा शिक्षकांच्या अस्मितेचा व अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर व अध्यापनाच्या दर्जावर गंभीर परिणाम होत आहे.

गंभीर आजारांच्या वेळी वैद्यकीय बिलांच्या परताव्यासाठी शिक्षकांना सरकारी कार्यालयांचे खेटे मारावे लागतात. म्हणूनच शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांनाही तात्काळ 'कॅशलेस' वैद्यकीय उपचार सुविधा मिळाली पाहिजे.

विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या अनुदानाचा टप्पा वाढवणे आणि थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावणे अत्यंत गरजेचे झाले आहे. प्रलोभनांना बळी न पडता मतदानाचा विवेक जागवा निवडणुकीच्या काळात उमेदवारांकडून रंगवणारी आश्वासने, हॉटेल्समधील जेवणावळी आणि विविध भेटवस्तूंचा सुटसुटीत मारा केला जातो. मात्र, अशा अल्पमुदतीच्या प्रलोभनांना बळी न पडता, शिक्षकांनी स्वतःच्या आणि येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्याचा विचार करून मतदान करणे ही काळाची गरज आहे. "सभागृहात शिक्षकांचा बुलंद आवाज बनून कोण पोहोचू शकतो?" आणि "शासकीय स्तरावर आपले प्रश्न ताकदीने कोण मांडू शकतो?"

# चार विद्यार्थ्यांची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

## अमन भगत, गौरी सोळंके, सुरक्षा डोंगरदिवे प्रथम

◆ **विदर्भ केसरी**

मंगरूळपीर, ता. १४ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने वाशिम येथील जिल्हा क्रीडा संकुलात ९ व १० ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित शालेय जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत मंगरूळपीर येथील सिद्धार्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

बांबू उडी या क्रीडा प्रकारात तीन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर एका विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक मिळविला. या यशामुळे विद्यालयातील चार विद्यार्थ्यांची विभागीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या गटात अमन राहुल भगत याने बांबू उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. याच वयोगटातील मुलींच्या स्पर्धेत कु. गौरी अभिजित सोळंके हिने प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात प्रसन्न सुरेश मनवर याने द्वितीय क्रमांक मिळविला, तर १९ वर्षांखालील मुलींच्या गटात कु. सुरक्षा निळकंठ डोंगरदिवे हिने प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोक कांबळे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कु. किरण कांबळे, पर्यवेक्षक गजानन जगताप, शारीरिक शिक्षण शिक्षक जगन्नाथ उगले तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# वंचित लाडक्या बहिणींचे अर्ज स्वीकारून समस्यांचे निराकरण करा

## महिला काँग्रेस च्या शहराध्यक्षा जयश्री नरवाडे यांची मागणी

◆ **शेरखान पठाण / विदर्भ केसरी**

महागाव, ता. १४ : लाडक्या बहिणींचे अनुदान बंद झाल्याने त्यांना मदत मिळावी याकरिता काँग्रेसच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये हजारो वंचित महिलांनी आपले अर्ज केले होते ते अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याची मागणी महिला काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष ,नगरसेविका सौ.जयश्री नरवाडे यांनी निवेदनाद्वारे महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे केली आहे. महागाव तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींचे शासनाकडून मिळणारे अनुदान विविध त्रुटी दाखवित अचानक बंद केले गेले त्यामुळे या वंचित लाडक्या बहिणींना अनुदान मिळवुन देण्यासाठी महागाव तालुका महिला काँग्रेस कमिटी,काँग्रेस कमिटी यांच्या वतीने दिनांक ३०सप्टेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरात योजनेच्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या हजारो



महिलांनी उपस्थिती लावुन राज्य शासनाच्या तुघलकी कारभाराचा निषेध करीत आक्रोश व्यक्त करून आपले अर्ज सादर केले.यावेळी तालुक्यातील ११४६वंचित महिलांनी काँग्रेस कडे अर्ज सादर करून न्याय मिळवुन द्यावा अशी मागणी होती.

त्याच अनुषंगाने या शिबिराच्या आयोजक महिला काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षा,नगरसेविका सौ.जयश्री संजय नरवाडे यांनी महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी महागाव यांच्याकडे निवेदन सादर करून शिबिरात आलेल्या वंचित लाडक्या बहिणींचे अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्यांचे निराकरण करून त्यांना अनुदान पुर्ववत सुरू करण्याची मागणी केली.

# किनवट–माहूरच्या राजकारणात 'सचिनभाऊ' नावाची चर्चा!

## स्व. प्रदीप नाईक यांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी

◆ **डॉ. भारत राठोड**

किनवट, ता. १४ : किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाच्या राजकीय वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सचिनभाऊ नाईक यांच्या नावाची चर्चा पुन्हा एकदा रंगू लागली आहे. स्वर्गीय आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनानंतर मतदारसंघातील राजकीय समीकरणे, कार्यकर्त्यांच्या अपेक्षा आणि स्थानिक नेतृत्वाची भूमिका यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत स्व. प्रदीप नाईक यांच्याशी जोडलेला राजकीय वारसा पुढे नेण्याची जबाबदारी कोणत्या दिशेने जाते, याकडे कार्यकर्ते आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. गावागावांतील



राजकीय चर्चांपासून कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींपर्यंत सचिनभाऊ नाईक यांच्या नावाचा उल्लेख होत असल्याचे समर्थक सांगतात. मात्र राजकारणात चर्चेपेक्षा जनतेशी असलेले नाते, लोकांच्या प्रश्नांवरील भूमिका आणि प्रत्यक्ष कामगिरी अधिक महत्त्वाची ठरते. त्यामुळे आगामी काळात सचिनभाऊ नाईक यांची राजकीय वाटचाल कोणते वळण घेते, याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे. सचिनभाऊ नाईक यांच्याबाबतही त्यांच्या समर्थकांच्या अपेक्षा याच स्वरूपाच्या आहेत. सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेणे, गावपातळीवरील कार्यकर्त्यांना विश्वासात घेणे आणि प्रशासनाच्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे, या बाबींवर त्यांच्या पुढील वाटचालीची दिशा ठरू शकते. किनवट-माहूरमध्ये राजकीय स्पर्धा आणि बदलती समीकरणे लक्षात घेता स्थानिक नेतृत्वाला जनतेशी सातत्याने जोडलेले राहावे लागणार आहे. केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्यांच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे, हेच नेतृत्वाच्या विश्वासार्हतेचे महत्त्वाचे मापदंड ठरणार आहेत.

# अल्पवयीन मुलाच्या हातात वाहन दिले

हिंगणघाट, ता. १४ : अल्पवयीन मुलाला वाहन चालविण्यास दिल्याप्रकरणी हिंगणघाट येथील जितेंद्र आनंदराव रघाटाटे यांना न्यायालयाने २५ हजार १०० रुपयांचा दंड ठोठावला. मोटार वाहन कायद्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. १५ ऑगस्ट २०२६ रोजी हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात तीन अल्पवयीन मुलींना प्राण गमवावे लागले होते. अल्पवयीन वाहनचालकांविरुद्ध विशेष मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास दिल्याप्रकरणी वाहनमालक व पालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

# निंबोडीला सुरळीत वीजपुरवठा करा, अन्यथा हलगी आंदोलन!

◆ **भिगवण, ता.१४,(वार्ताहर)**

बारामती तालुक्यातील निंबोडी गावात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी आणि पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा फटका बसत आहे. महावितरणकडून गावाला सुरळीत वीजपुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी येत्या १६ ऑक्टोबर २०२६ पासून पारवडी सबस्टेशनसमोर गुराढोरांसह हलगी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा येथील ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

निंबोडी हे तालुक्याच्या टोकाला असलेले गाव असून, येथे सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत लोडशेडिंग होत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. त्यातच कोणतीही निश्चित वेळ न पाळता मनमानी पद्धतीने वीजपुरवठा बंद केला जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

दिवसभरात केवळ दोन तास वीज उपलब्ध होते, तर सिंगल फेज वीजपुरवठाही वारंवार खंडित होत असल्याने गावातील दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले आहेत. वीजपुरवठ्याच्या अनियमिततेमुळे विद्यार्थ्यांना सायंकाळच्या वेळी अभ्यास करताना अडचणींचा सामना करावा



लागत आहे. गावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि गावठाणातील वीजव्यवस्थाही प्रभावित झाली आहे.

तलावात थोडेफार पाणी उपलब्ध असतानाही वीज नसल्यामुळे ग्रामस्थांना पाणीपुरवठ्यासाठी दिवसभर प्रतीक्षा करावी लागत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे एकीकडे दुष्काळसदृश परिस्थिती, तर दुसरीकडे शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा वेळेवर मिळत नसल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. नियमानुसार थ्री फेज वीजपुरवठा होत नसल्यामुळे पिकांना पाणी देण्यात अडथळे निर्माण होत असून, हातातोंडाशी आलेली पिके जळण्याच्या मार्गावर आहेत. पिके वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता आणि वीजपुरवठा या दोन्ही समस्यांशी झुंज द्यावी लागत आहे.

निंबोडी गावातील वीजपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महावितरण कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, अद्याप सिंगल फेज फिडर सुरू करण्याबाबत अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. गेल्या वर्षभरापासून या कामाला मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष काम पूर्ण होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

त्यामुळे महावितरणने निंबोडी गावातील वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवून सिंगल फेज फिडरचे काम पूर्ण करावे आणि शेतीसाठी नियमानुसार वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अन्यथा, १६ ऑक्टोबर २०२६ पासून पारवडी सबस्टेशनसमोर गुराढोरांसह हलगी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# जिथे पाकिस्तानातील बलूचिस्तानवरून आली आदिशक्ती

## अकोलीच्या श्री हिंगलाज माता मंदिराचा इतिहास : बहरलाय साडेसातशे वर्षांचा दैवी वारसा

◆ **मूर्तिजापूर प्रतिनिधी**

मुर्तीजापूर, ता. १४ : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील हिंगोल नदीच्या काठावर वसलेले जगप्रसिद्ध श्री ज्वालामुखी हिंगलाज देवीचे मंदिर हे जगभरातील हिंदू भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मात्र, देवीला हवा असलेला खरा, निष्कलंक भक्त आणि शांत शोध घेत असतांना आदिशक्तीने थेट वऱ्हाडातील अमरावती जवळील 'सत्य अरण्य' नावाच्या घनदाट जंगलात पाऊल ठेवले. आज हेच पवित्र स्थान वऱ्हाडातील 'अकोली' नगरी म्हणून ओळखले जाते. १२ व्या शतकापासूनचा इतिहास असलेला हा परिसर अध्यात्म, इतिहास आणि निसर्गाचा अद्भुत संगम ठरला आहे.

कल्याण गडावरून वऱ्हाडात आगमन: असा आहे भगत घराण्याचा ५ वेळा बदललेला इतिहास

या देवस्थानचे विद्यमान सेवाधारी भगत कुटुंब हे मूळचे सूर्यवंशी असून, १२ व्या शतकात ते कल्याण गडाचे रहिवासी होते. काळाच्या ओघात त्यांचा प्रवास कल्याण गड ते देवगिरी, त्यानंतर रायगड आणि पुढे थेट वऱ्हाडात झाला. या ऐतिहासिक प्रवासात या घराण्याचे आडनाव तब्बल पाच वेळा बदलले. सुरवातीला सूर्यवंशी असलेले हे कुटुंब पुढे यादव,



नंतर जाधव, त्यानंतर रंगाचार्य आणि आता आई हिंगलाज देवीचे मुख्य पुजारी असल्यामुळे 'भगत' या पदवीने संपूर्ण महाराष्ट्रात नावारूपास आले. सध्या या प्राचीन मंदिराची धुरा चिमणाजी महाराज यांचे नववे वंशज श्री राजेंद्र महाराज भगत सांभाळत आहेत. चक्रवर्ती सम्राट सोमेश्वर यांना देवीचा दृष्टांत आणि हेमाडपंथी मंदिराची निर्मिती बाराव्या शतकातील महान हिंदू शासक चक्रवर्ती सम्राट सोमेश्वर यांना देवीने स्वप्नात दृष्टांत देऊन हळदी-कुंकवाचा नकाशा दाखवला. सात शिवारांच्या कुशीत असलेल्या 'सत्य अरण्य' नावाच्या जंगलात हे मंदिर उभारण्यास सांगण्यात आले.

येथे गाई-गुरं राखणारे निष्कलंक भक्त श्री चिमणाजी महाराज जाधव, त्यांचे वडील सत्ताजी महाराज आणि तपस्वी अमृतगिरी महाराज वास्तव्यास होते. देवीच्या आजेनुसार शुद्ध चुना, खरप, दगड, बेल आणि मातीपासून या भव्य हेमाडपंथी मंदिराची निर्मिती झाली. पुढे उत्तर भारताची लढाई जिंकल्यावर सम्राट सोमेश्वर यांनी आपला विजयोत्सव साजरा करत हिंगलाज मातेला छत्री, घोडा आणि तलवार अर्पण केली होती. १६ व्या शतकात छत्रपती शिवरायांचे आजोबा राजे लखोजीराव जाधव देशमुख यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला, तर पुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी हे कार्य पूर्णत्वास नेले. ऐतिहासिक वास्तू आणि संतांच्या जिवंत समाध्या अकोलीचे हे मंदिर केवळ धार्मिकच नव्हे, तर ऐतिहासिक वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

मंदिराच्या दर्शनी भागात मोराची आकर्षक प्रतिकृती, प्राचीन विहीर, भव्य होमकुंड, दीपमाळ आणि ऐतिहासिक बारादारी पाहायला मिळते. * संत समाधी: देवीचे गुरु अमृतगिरी महाराज यांची समाधी, देवीला शरण आलेले शाहनूरशाह फकीर महाराज यांची जिवंत शरण समाधी आणि १० पिढ्यांपासून सेवा करणाऱ्या भगत परिवाराचे समाधी स्थळ येथे विद्यमान आहे. * सात शिवारांचे रस्ते: संकट काळात किंवा आपत्तीच्या वेळी सुरक्षित हालचालींसाठी या घनदाट जंगलातून सात गावांमध्ये जाणाऱ्या गुप्त वाटा आजही अस्तित्वात आहेत. अद्भूत चमत्कार: बेंबळा नदीचे गुप्त जलतीर्थ आणि गाडपगाड सोहळा

येथील उत्सव आणि परंपरा अत्यंत अनोख्या आहेत. अश्विन व चैत्र नवरात्रोत्सवात होम-हवन आणि विजयादशमीचा पालखी सोहळा भव्य प्रमाणात होतो. विशेषतः चैत्र शुद्ध पौर्णिमेला होणारा परंपरेचा 'गाडपगाड सोहळा' भाविकांचे मुख्य आकर्षण आहे.

### कसे पोहोचायचे?

**अकोली गाव अमरावती–कारंजा महामार्गावर असून, मुख्य स्टॉपपासून पश्चिमेस अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर आहे. तसेच अमरावती–अकोला महामार्गावरील जामठी गावापासून हे अंतर ४किलोमीटरचे आहे. अकोली येथे जाण्यासाठी एसटी बसेस आणि खाजगी वाहनांची उत्तम सुविधा उपलब्ध आहे.**

# वाढदिवासा निमित्त वृक्षारोपण

◆ **विदर्भ केसरी**

पांढरकवडा, ता. १४ : तौसिफ शेख, इस्माईली खोजा समाजाचे आगाखान (५) यांच्या ५५ व्या वाढ दिवसानिमित्त समाजाच्या वतीने पांढरकवडा शहरात दि.१२ ऑक्टोंबर रोजी सकाळी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हिरवाई जपण्याचा संदेश देत समाजातील सदस्यांनी उत्स्फूर्तपणे या उपक्रमात सहभाग घेतला.वाढ दिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमातून साजरा करण्याचा निर्णय समाजबांधवांनी घेतला.त्यानुसार सकाळच्या सुमारास समाजातील सदस्य एकत्र आले आणि परिसरात विविध रोपांची लागवड केली. वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्पही उपस्थितांनी केला.या कार्यक्रमाला समाजाचे मुखिया नूरुद्दीन गिलानी तसेच इद्रिस जिवानी यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर,महीला,ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी पर्यावरणाचे वाढते महत्त्व,वृक्षतोडीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि भविष्यात अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची गरज याबाबत उपस्थितांमध्ये जनजागृती करण्यात आली. वाढ दिवसाच्या निमित्ताने करण्यात आलेल्या या वृक्षारोपणामुळे समाजाच्या सामाजिक कार्याला पर्यावरण संवर्धनाची जोड मिळाली आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समाजातील सदस्यांनी परिश्रम घेतले.



## प्रकृती बिघडल्याने व्यक्तीचा मृत्यू

◆ वर्धा : मांडवा येथे ३५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. ११ ऑक्टोबर रोजी ही घटना घडली. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिसांनी नोंद केली. योगेश रामदास मडावी (वय ३५, रा. मांडवा) असे मृताचे नाव आहे. प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सावंगी पोलिसांनी नोंद केली.

## सक्षिप्त

### तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला

**वर्धा :** कारला येथील मोकळे ले-आउट परिसरात २० वर्षीय तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. प्रज्वल संजय कुकुडे हा तरुण आपल्या घरासमोरील किराणा दुकानात चिप्स घेण्यासाठी गेला असता, तिथे गावातील जुबेर शेख हा आला. जुबेरने प्रज्वलला सावजी नगरीकडे चल, असे म्हटले. प्रज्वलने सोबत येण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या जुबेरने त्याला अश्लील शिवीगाळ केली आणि आपल्या जवळील चाकूने प्रज्वलच्या पाठीवर व मानेवर सपासप वार केले. याप्रकरणी सावंगी पोलिसात तक्रार दाखल केली.

### चोरट्याने समर्सिबल पंप पळविला

**वर्धा :** सावंगी बायपास रोडवरील नागठाणाजवळील एका ले-आऊटवरील बंद ऑफिसचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी समर्सिबल पाण्याची मशीन लंपास केली. संदीप रामदास नगराळे यांचे परिसरात टिनाच्या शेडचे ऑफिस आहे. चोरट्याने ऑफिसच्या दाराची कडी व कुलूप तोडून आत प्रवेश केला एकूण २८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी सावंगी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

### १० जनावरांची केली सुटका

**सेलू :** जामणी परिसरात पोलिसांनी कारवाई करत कत्तलखान्याकडे बेकायदेशीरपणे वाहतूक केली जाणारी १० जनावरे जप्त करत त्यांची सुटका केली. प्रशांत तुळशीराम धुर्वे (वय ३०, रा. गवंडी, कारंजा) हा एमएच ३२ एजे ०९९० क्रमांकाच्या आयशर वाहनातून लहान-मोठी १० जनावरे अत्यंत निर्दयतेने, कोंबून वाहतूक करत होता. या जनावरांना कोणतीही वैद्यकीय सुविधा वा चारा-पाण्याची सोय नव्हती.

# व्यवस्थापकाचा मुजोर कारभार चव्हाट्यावर

## मानोरा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक : कर्ज मागायला गेलेल्या शेतकऱ्याला बँकेतून हाकलल्याचा आरोप

◆ विदर्भ केसरी प्रतिनिधी

**मानोरा, ता. १४ : जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी सध्या संकटात असताना त्याला मदतीचा हात देण्याऐवजी हाकलून लावल्याचा धक्कादायक प्रकार मानोरा शहरात समोर आला आहे.**

महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा मानोरा चे व्यवस्थापक शेतकऱ्यांना उद्धट भाषा वापरून मानसिक त्रास देत असून कर्ज मागायला गेलेल्या शेतकऱ्याला अपमानास्पद वागणूक देऊन बँकेतून हाकलून दिल्याची लेखी तक्रार जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे करण्यात आली आहे. या प्रकरणी शेतकरी गोपाळकृष्ण नामदेव चव्हाण, रा. नविन सोनखास, ता. मं.पीर, जि. वाशिम (शेत मौजा देवठाणा, ता. मानोरा, शेत स.नं. १७९, क्षेत्र १ हे. ९९ आर) या शेतकऱ्याने दि. १३-१०-२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे विनंती अर्ज दाखल केला आहे. तरीही सध्याच्या शाखा व्यवस्थापकाने मनमानी सुरू केली आहे. चव्हाण यांच्या अर्जानुसार - "शाखा व्यवस्थापक मनमानी उद्धट भाषा वापरून शेतकऱ्यांना मानसीक त्रास देतात आणि माझ्या अर्जाचा विचार न करता ते आम्हाला बँकेतून हाकलून देतात आणि म्हणतात की, तुमच्याकडून जे होईल ते करा. मी कर्ज मंजूर करणार नाही. अपमानीत करतात." जर बँक व्यवस्थापक असेच उत्तर देत असतील तर आम्ही कोणाकडे कर्ज मागायचे हा प्रश्न आमच्यासमोर येतो, अशी व्यथा गोपाल कृष्ण चव्हाण या शेतकऱ्याने मांडली आहे. यामध्ये कायद्याचे गंभीर उल्लंघन - या उद्दाम वर्तनामुळे बँक व्यवस्थापकाकडून खालील कायदे व नियमांचे उल्लंघन झाले आहे, असा कायदेशीर मुद्दा या प्रकरणात उपस्थित होत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मास्टर डायरेक्शनचा भंग :- आरबीआय च्या केसीसी (किसान क्रेडिट कार्ड) व प्रायोरिटी सेक्टर लीडिंगच्या नियमानुसार पात्र शेतकऱ्याला १४ दिवसांत पीक कर्ज देणे बंधनकारक आहे. लेखी व संयुक्तिक कारणाशिवाय कर्ज नाकारता येत नाही. बँकिंग लोकपाल योजना २०२१ चे उल्लंघन :-ग्राहकाला उद्धट वागणूक देणे, सेवेत त्रुटी करणे हे बँकिंग लोकपालकडे तक्रार करण्यास पात्र कारण आहे. महाराष्ट्र सावकारी कायद्याला प्रोत्साहन :-शासकीय बँकेने कर्ज नाकारल्यास शेतकरी खासगी सावकाराकडे जाण्यास भाग पडतो, ज्यामुळे शेतकरी आत्महत्येसारखे प्रकार घडतात, याची जबाबदारी कोणाची ?

### शेतकऱ्याचा आरोप नेमका काय ?

■ तक्रारदार शेतकरी चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना आतापर्यंत निर्विघ्नपणे शेतीसाठी बँकेतून कर्ज मिळत होते. अहिल्यादेवी होळकर शेती पीक कर्ज माफी २०२६ मार्फत त्यांचे कर्ज माफ देखील झाले आहे आणि त्यांनी त्याबाबतचा उल्लेखही अर्जात केला आहे. त्यांच्यावर कोणतीही थकबाकी नसल्याचे त्यांनी हस्तलिखित शेऱ्यात "माझ्याकडे कोणत्याही बँकेचे कर्ज नाही आहे" असे नमूद केले आहे.




◆ **शेतकऱ्याची मागणी**
**सदर व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करून सदर विषयाची सखोल चौकशी करण्यात यावी व शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे. जिल्हा प्रशासनाने या मुजोर अधिकाऱ्यावर कारवाई करून शेतकऱ्याला तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.**

# गणित-विज्ञान शिक्षकांची सभा संपन्न

## ९६ शाळांतील गणित-विज्ञान शिक्षकांचा सहभाग

◆ विजय निखाते



पुसद, ता. १४ : शिक्षण विभाग, पंचायत समिती पुसद यांच्या वतीने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन व बाल वैज्ञानिक उपक्रमाच्या नियोजनासाठी पुसद तालुक्यातील गणित-विज्ञान शिक्षकांची सभा आयोजित करण्यात आली. या सभेला गटशिक्षणाधिकारी श्री. धीरज आडे, तालुका विज्ञान प्रमुख तथा विस्तार अधिकारी (शिक्षण) श्री. अमित बोजेवार, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक श्री. अशोक पोले तसेच पुसद तालुक्यातील एकूण ९६ शाळांमधील गणित-विज्ञान शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती, सर्जनशीलता, चिकित्सक विचारसरणी आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाचा दैनंदिन जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपयोग व्हावा, या उद्देशाने विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन करण्यात येत आहे.

बाजारातून तयार साहित्य खरेदी करून प्रकल्प सादर करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पना, प्रयोगशीलता आणि सर्जनशीलतेच्या आधारे प्रकल्प तयार करावेत, याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी सक्षम अधिकाऱ्याचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

राज्य विज्ञान संस्थेच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे सविस्तर वाचन करून त्यानुसार शाळास्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे आणि विज्ञान प्रदर्शनासाठी दर्जेदार, नावीन्यपूर्ण व उपयुक्त प्रकल्प तयार करून घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले.

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी

◆ विदर्भ केसरी



पुसद, ता. १५ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 12 व 13ऑक्टोबर 2026 रोजी अभ्यंकर कन्या शाळा , यवतमाळ येथे जिल्हा स्तरीय शालेय खो खो स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत अंडर-१४ मुला-मुलींच्या वयोगटात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, वालतूर तांबडे येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व नेत्रदीपक कामगिरी करत खो खो क्रीडा प्रकारांत यश संपादन केले. विशेष म्हणजे मागील वर्षी सुद्धा जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेत दोन्ही संघ विजयी होऊन विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. यावर्षी सुद्धा दोन्ही संघाने प्रथम क्रमांक मिळवून विभागीय शालेय खो खो स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. या यशाबद्दल शाळेतील सर्व यशस्वी खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या मेहनतीला शाळेचे मुख्याध्यापक व क्रीडा मार्गदर्शक मधुकर मोरझडे तसेच शिक्षकवृंदाचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडूंचे गटशिक्षणाधिकारी धीरज आडे, विस्तार अधिकारी विश्रांती फोपसे,उमेश वाघमारे, अमित बोजेवार, शितलकुमार वानखडे, केंद्रसमन्वयक प्रल्हाद जाधव, यशवंत अघम , शाळेचे शिक्षक विकास वाकडे, जयसिंग चव्हाण, किशोर दांदडे, सागर राऊत, विक्रम राठोड, प्रफुल्ल पांडे ,आलासिंग राठोड, बिबीषण राठोड, चंदूसिंग राठोड, नेमीचंद राठोड, राजू पवार, युवराज राठोड, दिलीप जाधव, परमानंद राठोड, सदानंद राठोड, बलदेव राठोड, रविराज राठोड, केवल भिसे, प्रकाश चिरंगे , राहुल जाधव, संतोष तांबारे,संतोष इंगोले,गजानन हमाने, चंदल पवार, निलेश राठोड, सुधाकर जाधव तसेच वालतूर तांबडे येथील सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले. विभागीय खो खो स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे वालतूर तांबडे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाची कार्यशाळा संपन्न

◆ संघरतन सरदार



अंजनगाव सुर्जी, ता. १४ : 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणारी कार्यशाळा बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता अंजनगाव सुर्जी येथील सिद्धेश मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेत अभियानाची उद्दिष्टे, ५९ निकषांवर आधारित गुणांकन पद्धती, स्वच्छ व शुद्ध पाणी, स्वच्छता, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी, माता-बाल आरोग्य, पोषण तसेच मानसिक आरोग्य आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना 'आरोग्य संपन्न गाव' म्हणून घोषित करून पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यशाळेला पंचायत समिती अंजनगाव सुर्जीचे गटविकास अधिकारी नवनाथ डापके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शंतनू नागपूरकर, 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचे मुख्य प्रशिक्षक डॉ. अंकुश मानकर, सातेगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जयस्वाल, कोकर्डाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पारडे, विस्तार अधिकारी आरोग्य अभिलाष धोटे तसेच समितीतील पत्रकार प्रतिनिधी सागर साबळे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेत गावपातळीवर विविध विभागांच्या समन्वयातून अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

# शेतकऱ्यांची थट्टा थांबवा!

## सुरेशभाऊ जोगळे यांचा मुख्यमंत्र्यांवर घणाघात

◆ विदर्भ केसरी

मूर्तिजापूर. ता. १४ : दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा राज्य शासनाकडून करण्यात आली आहे. मात्र, महागाईच्या या काळात ५ हजार रुपयांची ही मदत म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा असल्याचा संताप व्यक्त करत, विदर्भ राज्य आंदोलन समिती व शेतकरी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष, माजी सैनिक सुरेशभाऊ जोगळे यांनी या घोषणेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

५ हजार रुपयात कशी होणार दिवाळी? या विषयावर बोलताना सुरेशभाऊ जोगळे म्हणाले की, "जो शेतकरी संपूर्ण देशाचा पोशिंदा आहे, त्याला ५ हजार रुपयांची मदत देणे म्हणजे मदत आहे की भीक आहे? आजच्या महागाईच्या युगात खत, डिझेल आणि बियाण्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. एका एकराचा खताचा खर्चही ५ हजार रुपयात निघत नाही, मग शेतकरी या तुटपुंज्या पैशात दिवाळी कशी साजरी करणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

■ **शासनाने शेतकऱ्यांची ५ हजार रुपयात बोळवण न करता तात्काळ खालील मागण्या पूर्ण कराव्यात, अशी आक्रमक भूमिका विदर्भ राज्य आंदोलन समितीने घेतली आहे: कापसाला १२,००० रुपये आणि सोयाबीनला ८,००० रुपये हमीभाव जाहीर करावा. शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करण्यात यावे. दिवाळी बोनस म्हणून प्रत्येक शेतकऱ्याला किमान २५,००० रुपये देण्यात यावेत. अतिवृष्टी किंवा इतर कारणांमुळे झालेल्या नुकसानीपोटी १ लाख रुपये प्रति हेक्टर (म्हणजेच ४०,००० रुपये प्रति एकर) केवळ लागवड खर्च म्हणून तात्काळ द्यावा.**

"जर शासनाने शेतकऱ्यांच्या भावनांचा व मागण्यांचा विचार न करता केवळ ५ हजार रुपयांवरच बोळवण केली, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. रस्त्यावर उतरून शासनाच्या या निर्णयाची होळी करू, असा सज्जड इशाराही विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने सुरेशभाऊ जोगळे यांनी दिला आहे.

- **सुरेशभाऊ जोगळे** माजी जिल्हाध्यक्ष, शेतकरी संघटना / विदर्भ राज्य आंदोलन समिती, अकोला.

# फॉल्टी मीटरच्या नावाखाली स्मार्ट मीटर बसविण्याच्या तक्रारी

## वीजपुरवठा खंडित करण्याच्या इशाऱ्यांबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

◆ किशोर की कांबळे

दिग्रस, ता. १४ : दिग्रस तालुक्यात फॉल्टी मीटरच्या नावाखाली नवीन स्मार्ट मीटर बसविणे, वीज बिल दुरुस्तीसाठी नवीन मीटर बसविण्याची अट घालणे आणि मोबाईल संदेशाद्वारे वीजपुरवठा खंडित करण्याचे इशारे दिले जात असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष मो. शहबाज मो. अकील यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, दिग्रस तालुक्यात महावितरणचे मीटर रीडिंग घेणारे कंत्राटी कर्मचारी काही वीज मीटर फॉल्टी असल्याचे सांगत असून, त्यानंतर संबंधित ग्राहकांच्या घरी नवीन स्मार्ट मीटर बसविण्यात येत असल्याची तक्रार आहे. संबंधित मीटर प्रत्यक्ष तांत्रिक तपासणीत दोषपूर्ण आढळले आहेत का आणि मीटर फॉल्टी घोषित करण्यासाठी कोणते निकष वापरले जातात, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### चौकशी करण्याची मागणी



दिग्रस तालुक्यात मागील सहा महिन्यांत फॉल्टी घोषित केलेल्या मीटरची संख्या, तांत्रिक तपासणी अहवाल, मीटर बदलण्याच्या नोंदी तसेच मीटर रीडिंग घेणारी कंत्राटी एजन्सी आणि स्मार्ट मीटर बसविणाऱ्या कंपनीच्या कामकाजाची तपासणी करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने दखल घेऊन अधीक्षक अभियंता, महावितरण, यवतमाळ यांच्याकडून सविस्तर चौकशी अहवाल मागवावा आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी, अशी मागणी माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष मो. शहबाज मो. अकील यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे केली आहे.

# उडाण प्रभाग संघात 25 लाखांचा गैरव्यवहार

## बनावट सह्या, बँक स्टेटमेंटमध्ये फेरफार केल्याचा आरोप

वर्धा, ता. १४ : आर्वी तालुक्यातील विरूळ येथील उडाण प्रभाग संघाच्या आर्थिक व्यवहारांत २५ लाख ७ हजार ५१४ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा प्रकार समोर आला आहे. धनादेशांवर बनावट सह्या करून तसेच बँक स्टेटमेंटमध्ये फेरफार करून रक्कम वळविल्याचा आरोप असून, तत्कालीन लेखापाल प्रणाली निकेश दाभाडे हिच्यासह सहा जणांविरुद्ध पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे. उडाण प्रभाग संघांतर्गत २३ ग्रामसंघांच्या माध्यमातून ३०२ महिला बचतगट कार्यरत आहेत. प्रभाग समन्वयक धीरज संजय बावणे यांच्या तक्रारीनुसार, तत्कालीन लेखापाल प्रणाली दाभाडे ही २०१८ पासून जुलै २०२५ पर्यंत कार्यरत होती. आर्थिक व्यवहारांची तपासणी करताना २३ लाख ४० हजार रुपयांचे संशयास्पद व्यवहार आढळले. त्यानंतर बँक स्टेटमेंटची पडताळणी केली असता, विविध व्यक्तींच्या खात्यांवर धनादेशांद्वारे रक्कम हस्तांतरित केल्याचे निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला.

या प्रकरणात अवधूत सोनटक्के, राम उमेश हाडके, निकेश दाभाडे, देविदास दाभाडे आणि योगिता वसंत दाभाडे यांच्या खात्यांवर रक्कम हस्तांतरित केल्याचे तक्रारीत नमूद आहे. गैरव्यवहाराची रक्कम परत करण्याच्या मागणीनंतर संबंधित लेखापालाने १३ लाख ९६ हजार १५० रुपये परत केले; मात्र उर्वरित रक्कम अद्याप मिळाली नसल्याचा आरोप आहे.

या प्रकरणाची जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत चौकशी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. प्रणाली निकेश दाभाडे, निकेश दाभाडे, देविदास दाभाडे, योगिता वसंत दाभाडे, अवधूत सोनटक्के आणि राम उमेश हाडके यांच्याविरुद्ध संगनमताने आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### मालमत्तेच्या कागदपत्रांवरून धमकी

■ **गैरव्यवहारातून मिळालेल्या पैशांतून पुलगाव येथे भूखंड, विरूळ येथे घर आणि दोन दुचाकी खरेदी केल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. रक्कम परत करण्याच्या हमीपोटी भूखंड व घराची कागदपत्रे संघाकडे ठेवण्यात आली होती. मात्र, ही कागदपत्रे परत करण्यासाठी दबाव आणत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचाही आरोप तक्रारद धीरज संजय बावणे यांनी केला आहे.**

# असुविधांविरोधात अभाविपचे आंदोलन

◆ विदर्भ केसरी प्रतिनिधी

हिंगणघाट, १४ ऑटोबर येथील रा. सु. बिडकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, असुविधा आणि विद्यार्थीहिताच्या मागण्यांसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, हिंगणघाट नगरच्या वतीने महाविद्यालय प्रशासनाविरोधात आंदोलन केले.

पंधरा दिवसांपूर्वी अभाविपच्या वतीने महाविद्यालय प्रशासनाशी चर्चा करून निवेदन देण्यात आले होते.

मात्र, त्यानंतरही संबंधित मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नसल्याने विद्यार्थी परिषदेने आंदोलनाचे पाऊल उचलले. विद्यार्थ्यांच्या समस्या व मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी महाविद्यालय प्रशासनाने अभाविपच्या वतीने करण्यात आलेल्या मागण्या मान्य करून त्याबाबत लेखी आश्वासन दिले. निर्धारित वेळेत विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही अभाविपच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात प्रांत छात्राप्रमुख आर्या पाचखेडे, जिल्हा संयोजक बादल लोखंडे, नगरमंत्री रितेश बोबाटे, नगर सहमंत्री प्रणाली रघाटाटे, कार्यालयमंत्री राखी रघाटाटे, श्रेयस खेडकर, कृष्णा सातपुते, गणेश शेंडे, अटल बिहारी, पृथ्वीराज चव्हाण, श्रावणी चौधरी, जय शिंदे, राजेंद्र सहस्त्रबुद्धे आदींसह अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.



### अखेर कारंजा तालुका दुष्काळग्रस्ताच्या यादीत

कारंजा (घा.), ता. १४ : गत काही महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने संकटात सापडलेल्या तालुक्यातील बळीराजासाठी अखेर दिलासादायक निर्णय झाला.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने बुधवारी (ता. १४) प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार कारंजा तालुक्यासह वर्धा जिल्ह्यातील सर्व आठ तालुके अंतिमतः दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.

ट्रीगर -१ आणि ट्रीगर -२ निकषानुसार पर्जन्यमान कमी, पीक पेरणी व वाढीवर परिणाम झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळ जाहीर झाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना शासनाच्या १२ सवलती लागू होणार आहेत.

महत्त्वाचे



## सेवा संकल्प अभियानांतर्गत गडचिरोलीत ९ बालकांवर 'टंग टाय' शस्त्रक्रिया..

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : सेवा संकल्प अभियानांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालयात आयोजित विशेष 'टंग टाय' शस्त्रक्रिया शिबिरात ९ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्र (DEIC) आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या (RBSK) आश्रमशाळा तपासणी पथकाच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले. शाळा व आश्रमशाळांमधील आरोग्य तपासणीदरम्यान आढळलेल्या बालकांना संदर्भसेवेद्वारे निदान व उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नाक, कान व घसा तज्ज्ञ डॉ. आयुषी गुप्ता यांनी या शस्त्रक्रिया केल्या. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी गावंडे यांनी शस्त्रक्रिया कक्षास भेट देऊन पाहणी केली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरासाठी शस्त्रक्रिया कक्षाचे प्रभारी व कर्मचारी तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६'मध्ये सहभागाचे आवाहन

गडचिरोली, दि. १४ ऑक्टोबर :- विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण विचार, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६' आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी नोंदणीची अंतिम तारीख १७ ऑक्टोबर २०२६ आहे. या चॅलेंजमध्ये कृषी, आरोग्य, संरक्षण, नगरविकास यांसह विविध १० क्षेत्रांतील ५० विषयांवर नाविन्यपूर्ण संकल्पना सादर करण्याची संधी उपलब्ध आहे. उत्कृष्ट व निवडक संकल्पनांना नियमानुसार ५ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य मिळण्याची संधी आहे. गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक-युवती, महिला, स्टार्टअप, उद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत इच्छुकांनी अधिकृत नियमावली व पात्रतेचे निकष तपासून सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी केले आहे. नोंदणी व अधिक माहितीसाठी "sevainnovationchallenge.in" (http://sevainnovationchallenge.in) या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# संभाव्य पाणीटंचाईसाठी गावनिहाय नियोजन करा जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिले निर्देश

### ३६ संवेदनशील गावांवर विशेष लक्ष; ७६ गावांसाठी ८६ उपाययोजनांचा ४.३५ कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षण आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना गती द्यावी. भूजल पातळी घसरलेल्या संवेदनशील गावांची प्रत्यक्ष पाहणी करून गावनिहाय कृती आराखडा राबवावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली संभाव्य पाणीटंचाई व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सविस्तर आढावा बैठक पार पडली. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, निवासी उपजिल्हाधिकारी आशिष वानखेडे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद उद्धरवार, जिल्हा जलसंधारण अधिकारी सावन जयस्वाल आणि पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल मोरघडे उपस्थित होते. जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.



भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अहवालानुसार जिल्ह्यातील पाच तालुक्यांमधील ३६ संवेदनशील गावांमध्ये भूजल पातळी घसरल्याचे बैठकीत निदर्शनास आणण्यात आले. यामध्ये चामोर्शी, एटापल्ली, धानोरा, अहेरी व मुलचेरा तालुक्यांतील गावांचा समावेश आहे. या गावांतील जलस्त्रोतांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि संभाव्य गरज तपासून विशेष उपाययोजना करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पाणीटंचाई निवारणासाठी पंचायत समित्यांकडून प्राप्त प्रस्तावांच्या आधारे पहिल्या टप्प्यात ७६ गावांसाठी सुमारे ४ कोटी ३५ लाख रुपये खर्चाच्या ८६ उपाययोजनांचा आराखडा सादर करण्यात आला आहे. यामध्ये विंधन विहिरी, विहीर खोलीकरण आणि नळ पाणीपुरवठा योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे. गरज व संभाव्य टंचाईची तीव्रता लक्षात घेऊन कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा आणि नियमानुसार मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करून अंमलबजावणीला गती द्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या ५०० मीटर परिघात अनधिकृत बोअरवेल खोदण्यावरील निर्बंधांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. खासगी बोअरवेलमधील अतिउपशामुळे सार्वजनिक जलस्त्रोत प्रभावित होऊ नयेत, यासाठी महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे लक्ष ठेवावे. विनापरवानगी बोअरवेल खोदणाऱ्या वाहनांवर नियमानुसार कारवाई करून जप्तीची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. शासनाने नागरी व ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात लागू केली असून, त्यानुसार स्थानिक यंत्रणांनी पाणी वितरणाचे नियोजन करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासोबतच वितरणातील गळती व अपव्यय रोखण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण भागातील सौरऊर्जेवर चालणाऱ्या ड्युअल पंपांच्या नळांना तोट्या बसविणे आणि गळतीची दुरुस्ती करण्याची कार्यवाही ग्रामपंचायतींनी करावी, असे सांगण्यात आले. जलस्त्रोतांची शाश्वतता वाढविण्यासाठी जिल्ह्यातील १०५ गावांचा स्त्रोत बळकटीकरण आराखडा तयार करण्यात येत आहे. यामध्ये १४० रिचार्ज शाफ्ट, नाला खोलीकरण, गॅबियन बंधारे आणि जलशोषक खड्ड्यांसारख्या कामांचे नियोजन प्रस्तावित आहे. जिल्हा नियोजन समिती व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून या कामांचे एकात्मिक नियोजन करून भूजल पुनर्भरण आणि पाणीपुरवठ्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात आला. शेतीसाठी उपलब्ध पाण्याचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. उन्हाळी भातपिकासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागते. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा आणि पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेऊन पीक नियोजन करावे. हंगाम व स्थानिक परिस्थितीनुसार कमी पाण्यात येणारी कडधान्ये व इतर पिके घेण्यासाठी, तसेच सूक्ष्म सिंचनाचा वापर वाढविण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून जनजागृती करावी, असे त्यांनी सांगितले. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता अधिक असलेल्या गावांना उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी संयुक्तपणे भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा. प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यास सांगण्यात आले. जिल्ह्यातील कोणत्याही गावात पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर होऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयातून प्रस्तावित कामे पूर्ण करावीत आणि पाणीपुरवठ्याच्या स्थितीचा नियमित आढावा घ्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिल्या.

# सोनसरी आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी व कारवाईचे आदेश

### अधीक्षिकेच्या निलंबनाचे मंत्री डॉ. अशोक उईके यांचे निर्देश; कुटुंबीयांना दोन लाख रुपयांचे अनुग्रह अनुदान

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : कुरखेडा तालुक्यातील सोनसरी येथील शासकीय आश्रमशाळेत इयत्ता आठवीत शिक्षण घेणाऱ्या १४ वर्षीय विद्यार्थिनीच्या आत्महत्येच्या घटनेची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याचे तसेच संबंधित अधीक्षिकेला तात्काळ निलंबित करून तिच्यावर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना अनुग्रह अनुदान म्हणून दोन लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर डॉ. उईके यांनी कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयात भेट



देऊन विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधला आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेतली. या प्रकरणात कुटुंबाला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यानंतर पत्रकारांशी बोलताना डॉ. उईके यांनी आश्रमशाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. घटनेच्या अनुषंगाने संबंधितांची जबाबदारी तपासून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. गडचिरोली प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचनाही डॉ. उईके यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना दिल्या. आश्रमशाळांतील मुख्याध्यापक आणि अधीक्षक-अधीक्षिकांशी नियमित संवाद व संपर्क ठेवून शाळा आणि वसतिगृहांतील परिस्थितीची माहिती घ्यावी, असे त्यांनी सांगितले. यापुढे आश्रमशाळांमध्ये अशा प्रकारची घटना घडल्यास संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असा इशारा डॉ. उईके यांनी दिला. यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अरुण एम. , माजी आमदार कृष्णाजी गजबे, माजी आमदार नामदेवराव उसेंडी, चांगदेव फाये व संबंधित शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## कळमटोला येथे महिलांचा अवैध दारूविक्रीविरोधात पुढाकार. !

### मोहफुलांची दारू जप्त करून नष्ट

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : तालुक्यातील कळमटोला येथील महिलांनी परिसरात विक्रीसाठी ठेवलेली मोहफुलांची अवैध दारू जप्त करून ती जागीच नष्ट केली. गावातील अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी आणि सामाजिक स्वास्थ्य जपण्यासाठी महिलांनी हा धाडसी पुढाकार घेतला, असून सदर कारवाईत गावातील महिलांनी एकत्र येऊन दारूचे कॅन फोडून दारू नष्ट केली. महिलांच्या या कृतीमुळे गावात दारूमुक्त वातावरण निर्माण करण्याचा सकारात्मक संदेश गेला आहे.

गावकऱ्यांनी महिलांच्या या धाडसाचे कौतुक केले असून, "महिलांच्या एकजुटीला सलाम!" अशी भावना व्यक्त होत आहे. दारूमुक्त गाव, सुरक्षित कुटुंब आणि निरोगी समाज हेच आमचे ध्येय असल्याचे महिलांनी सांगितले. या घटनेमुळे कळमटोला परिसरात अवैध दारूविक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, प्रशासनानेही याची दखल घ्यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.



## नवरगाव आंधळी येथे भव्य खंजिरी भजन स्पर्धा उत्साहात

### गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यांतील ३५ पुरुष व महिला भजन मंडळांचा सहभाग

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कुरखेडा : कुरखेडा तालुक्यातील नवरगाव आंधळी येथे मंगळवार पारणूक गोपाल काला निमित्ताने १२ व १३ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य खंजिरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत गडचिरोली, गोंदिया व भंडारा या तीन जिल्ह्यांतील एकूण ३५ पुरुष व महिला भजन मंडळांनी सहभाग नोंदविला. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेला भजनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागातील पारंपरिक भजन संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे, भजन मंडळांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि भक्तीच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे, हा या स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. नरेंद्र आरेकर यांनी भजनाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, भजन ही केवळ गायनकला नसून मनात सात्त्विकता निर्माण करणारी साधना आहे. शरीराच्या पोषणासाठी ज्याप्रमाणे भोजनाची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे मनाच्या पोषणासाठी भजनाची आवश्यकता असते. भजनामुळे मनाचे शुद्धीकरण होऊन व्यक्तीमध्ये सकारात्मक विचारांची निर्मिती होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नरेंद्र आरेकर होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष रवींद्र गोटेफोडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदीश बोरकर, भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष तथा सीएम श्रीकांत नागिलवार, डॉ. मयूर नाकाडे, पुंडलिक नागपूरकर महाराज, रोशन सय्यद, कोसरे ताई, योगेश कवाडकर, लाडे आणि माजी पोलीस पाटील उईके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मानकर यांनी केले, तर साईनाथ कवाडकर यांनी आभार मानले.

या भव्य खंजिरी भजन स्पर्धेच्या पुरुष गटात गुरुदेव भजन मंडळ, केसरी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक गुरुदेव भजन मंडळ, मालेवाडा, तृतीय क्रमांक गुरुदेव भजन मंडळ, तुकमनारायण, चतुर्थ क्रमांक गुरुदेव शिवशक्ती भजन मंडळ, हेटीनगर, तर पाचवा क्रमांक श्री गुरुदेव भजन मंडळ, शिवनी यांनी मिळविला. महिला गटात जय मातादी भजन मंडळ, गुरनोली यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक मंजुळा माता महिला भजन मंडळ, पातळगोटा, तर तृतीय क्रमांक सावित्रीबाई फुले भजन मंडळ, परसटोला यांनी मिळविला. स्पर्धेत सहभागी झालेल्या भजन मंडळांसाठी विविध आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली होती. भजन मंडळांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळावी, यासाठी प्रोत्साहनपर बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच सहभागी मंडळांना सहभाग प्रमाणपत्रेही देण्यात आली. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी आयोजित बक्षीस वितरण कार्यक्रमात भाजपचे तालुकाध्यक्ष चांगदेव फाये यांच्या हस्ते विजेत्या भजन मंडळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रा. विनोद नागपूरकर, गाथे तलाठी आणि तमुसचे उपाध्यक्ष कवाडकर उपस्थित होते. गोपाल काला फोडून स्पर्धेच्या सांगतेनंतर पारंपरिक पद्धतीने गोपाल काला फोडण्यात आला. यानिमित्ताने गावकऱ्यांसाठी महाभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थ व उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. खंजिरी भजन स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील भक्तिपरंपरेला उजाळा मिळाला असून, या उपक्रमामुळे भजन मंडळांना आपली कला सादर करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. भजन स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यासाठी गावातील युवक वर्ग व गावकऱ्यांनी विशेष सहकार्य केले.




# कोरची आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना दिले वाहतुकीच्या नियमांचे धडे

### 'वेगापेक्षा सुरक्षितता महत्त्वाची'; नियमभंगाचे परिणाम सांगत उपप्रादेशिक परिवहन विभागाचे प्रभावी मार्गदर्शन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

कोरची : आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात वाहनांची संख्या आणि वेग झपाट्याने वाढत असताना रस्ते अपघातांचे संकटही गंभीर बनत आहे. क्षणिक निष्काळजीपणा, भरधाव वेग, हेल्मेटचा अभाव आणि वाहतुकीच्या नियमांकडे केलेले दुर्लक्ष अनेकांच्या आयुष्यावर कायमचा घाव घालत आहे. त्यामुळे वाहतुकीचे नियम हे केवळ दंड टाळण्यासाठी नसून स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचविण्यासाठी आहेत, हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यासाठी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, कोरची येथे रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, गडचिरोली यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक उमाकांत ढोक होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, गडचिरोली येथील




मोटार वाहन निरीक्षक किरण शिंदे उपस्थित होते. त्यांच्यासोबत चालक आयाज शेख उपस्थित होते. शाळेतील हरेश कामडी, भैयालाल कुरसंगे, अरुण कायंदे, मनोज गजभिये, अभिमन्यू वाटगुरे, प्रमोद शंभरकर, राहुल अंधारे, कृष्णा गावळे, गुरुराज मेंढे, कुणाल गोवर्धन आणि प्रदीप मासुरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

नियमभंग महागात पडणार; कायद्याचे भान ठेवा!

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोटार वाहन निरीक्षक किरण शिंदे यांनी वाहतुकीच्या नियमांचे महत्त्व स्पष्ट केले. वाहतुकीचे नियम मोडल्यास दंड, परवाना निलंबित किंवा रद्द होण्यासह कायद्यानुसार कठोर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असा इशारा त्यांनी दिला. विशेषतः अल्पवयीन मुलांनी वाहन चालविणे आणि पालकांनी त्याकडे दुर्लक्ष करणे किती गंभीर ठरू शकते, याची जाणीव त्यांनी करून दिली. अठरा वर्षांखालील मुलांना कायदेशीर पात्रता नसताना वाहन चालविण्यास देणे हा केवळ निष्काळजीपणा नसून कायद्याच्या दृष्टीने गंभीर प्रकार आहे. अशा प्रकरणांत संबंधित पालक किंवा वाहनमालकाला कायद्यानुसार तीन वर्षांपर्यंत कारावास आणि २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देऊन त्यांच्या आणि इतरांच्या जीवाशी खेळू नये, असे आवाहन त्यांनी केले. वाहन चालविताना हेल्मेट आणि सीटबेल्टचा नियमित वापर करावा, निर्धारित वेगमर्यादेचे पालन करावे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळावा आणि मद्यप्राशन करून कधीही वाहन चालवू नये, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. रस्त्यावर लेनची शिस्त पाळणे, दिशादर्शक चिन्हांचा अर्थ समजून घेणे, योग्य बाजूने प्रवास करणे आणि वाहन चालविण्याचा वैध परवाना प्राप्त केल्यानंतरच वाहन चालविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अपघात घडल्यास घाबरून न जाता तातडीने मदतीसाठी १०८ या रुग्णवाहिका क्रमांकावर संपर्क साधावा, असे मार्गदर्शनही करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मिळाली उत्तरे

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम, वाहन चालविण्याचे कायदेशीर वय, अपघाताच्या वेळी घ्यावयाची खबरदारी आणि नियमभंगाबद्दलच्या दंडात्मक तरतुदींविषयी प्रश्न विचारले. मार्गदर्शकांनी त्यांच्या शंकांचे निरसन करून रस्ता सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी मोटार वाहन निरीक्षक किरण शिंदे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा दिली. इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्याबरोबरच सुरक्षित प्रवासाची सवय रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या विद्यार्थी मंत्रिमंडळाने सहकार्य केले. रस्ते अपघात रोखण्यासाठी केवळ शासनाचे नियम पुरेसे नाहीत; प्रत्येक नागरिकाची जबाबदारीची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. कारण घरी कोणीतरी आपली वाट पाहत असते—हे भान प्रत्येक वाहनचालकाने ठेवले, तर अनेक अपघात टाळता येतील. वेगाचे आकर्षण क्षणिक असते; मात्र सुरक्षित जीवन अनमोल असते!


दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६


# दुष्काळग्रस्त गडचिरोली व चामोर्शी तालुक्यांत मोफत धान्य वितरणाचे केले विशेष नियोजन

## नवीन पात्र लाभार्थ्यांच्या समावेशावर भर; स्थलांतरितांना इतर ठिकाणच्या रास्तभाव दुकानातून धान्य घेण्याची सुविधा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : दुष्काळग्रस्त गडचिरोली व चामोर्शी तालुक्यांतील पात्र कुटुंबांना नियमित मोफत अन्नधान्याचा पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी, शेतमजूर आणि गरजू नागरिकांना अन्नधान्याची टंचाई भासू नये, यासाठी नवीन पात्र लाभार्थ्यांचा योजनेत समावेश, स्थलांतरितांना अन्य ठिकाणी धान्य घेण्याची सुविधा आणि वेळेवर वितरणावर भर देण्यात येत आहे. राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत पर्जन्यमानातील तूट व अन्य घटकांमुळे प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये खरीप २०२६ हंगामासाठी 'ट्रिगर-१' अंतर्गत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली आणि चामोर्शी या दोन तालुक्यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने ९ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा पुरवठा विभागाच्या माहितीनुसार, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत जिल्हाभरात सध्या अंत्योदय अन्न योजनेतील १ लाख २ हजार ९०८ शिधापत्रिकांवर दरमहा प्रति शिधापत्रिका ३५ किलो मोफत अन्नधान्य वितरित केले जात आहे. तसेच प्राधान्य कुटुंब योजनेतील ४ लाख ७३ हजार ९८० लाभार्थ्यांना दरमहा प्रति व्यक्ती ५ किलो मोफत अन्नधान्य दिले जात आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या नियमित लाभाचे वितरण विनाविलंब व्हावे आणि एकही पात्र कुटुंब अन्नधान्यापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत. रोजगार अथवा पाण्याच्या शोधात स्थलांतर करणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना 'वन नेशन वन रेशन कार्ड' अंतर्गत पोर्टेबिलिटी सुविधेचा लाभ घेता येणार आहे. या सुविधेमुळे लाभार्थ्यांना ई-पॉस यंत्राद्वारे जिल्ह्यातील किंवा जिल्ह्याबाहेरील जवळच्या रास्तभाव दुकानातून त्यांच्या हक्काचे मोफत अन्नधान्य मिळवता येईल. त्यामुळे स्थलांतर झाल्यानंतरही धान्याचा लाभ घेता येणार आहे. दुष्काळग्रस्त भागातील ज्या गरजू नागरिकांचा राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत अद्याप समावेश झालेला नाही, त्यांनी संबंधित तालुका पुरवठा शाखा किंवा तहसील कार्यालयाकडे समावेशासाठी मागणी करावी. त्यांची पात्रता तपासून, नियमानुसार योजनेतील मंजूर लाभार्थी संख्येच्या उपलब्ध मर्यादेत अंत्योदय अन्न योजना किंवा प्राधान्य कुटुंब योजनेत समावेशाची कार्यवाही करण्यात येईल. शिधापत्रिकेशी आधार क्रमांक जोडण्याची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित पात्र लाभार्थ्यांना धान्य उपलब्ध करून दिले जाईल. 'मिशन सुधार' अंतर्गत यापूर्वी रद्द झालेल्या शिधापत्रिकांमुळे उपलब्ध झालेल्या मर्यादेत दुष्काळग्रस्त भागातील नवीन पात्र लाभार्थ्यांना समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून योजनेबाहेर असलेल्या गरजू पात्र कुटुंबांना अन्नधान्याचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे. धान्याची उचल आणि रास्तभाव दुकानांमधून वाटप वेळेत पूर्ण होण्यासाठी आगाऊ व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच धान्याचा काळाबाजार व अवैध साठेबाजी रोखण्यासाठी पुरवठा विभागाची नियंत्रण यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. पात्र शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळण्यात अडचण येत असल्यास किंवा वितरणाबाबत तक्रार असल्यास संबंधित रास्तभाव दुकानदार, तालुका पुरवठा शाखा किंवा तहसील कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा. योजनेत समाविष्ट नसलेल्या गरजू नागरिकांनी पात्रतेनुसार समावेशासाठी संबंधित कार्यालयाकडे मागणी करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी मनोज डहारे यांनी केले आहे.

# शासनाने ५००० रुपयात शेतक-यांची थट्टा थांबवा!

## सुरेश जोगळे यांचा मुख्यमंत्र्यांवर घणाघात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मूर्तिजापूर : दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार रुपये जमा करण्याची घोषणा राज्य शासनाकडून करण्यात आली आहे. मात्र, महागाईच्या या काळात ५ हजार रुपयांची ही मदत म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा असल्याचा संताप व्यक्त करत, विदर्भ राज्य आंदोलन समिती व शेतकरी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष, माजी सैनिक सुरेशभाऊ जोगळे यांनी या घोषणेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. या विषयावर बोलताना सुरेशभाऊ जोगळे म्हणाले की, "जो शेतकरी संपूर्ण देशाचा पोशिंदा आहे, त्याला ५ हजार रुपयांची मदत देणे म्हणजे मदत आहे की भीक आहे? आजच्या महागाईच्या युगात खत, डिझेल आणि बियाण्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. एका एकराचा खताचा खर्चही ५ हजार रुपयात निघत नाही, मग शेतकरी या तुटपुंज्या पैशात दिवाळी कशी साजरी करणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शासनाने शेतकऱ्यांची ५ हजार रुपयात बोळवण न करता तात्काळ खालील मागण्या पूर्ण कराव्यात, अशी आक्रमक भूमिका विदर्भ राज्य आंदोलन समितीने घेतली आहे: कापसाला १२,००० रुपये आणि सोयाबीनला ८,००० रुपये हमीभाव जाहीर करावा.

> जर शासनाने शेतकऱ्यांच्या भावनांचा व मागण्यांचा विचार न करता केवळ ५ हजार रुपयांवरच बोळवण केली, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. रस्त्यावर उतरून शासनाच्या या निर्णयाची होळी करू, असा सज्जड इशाराही विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने सुरेशभाऊ जोगळे यांनी दिला आहे.
>
> — **सुरेशभाऊ जोगळे**,
> माजी जिल्हाध्यक्ष, शेतकरी संघटना / विदर्भ राज्य आंदोलन समिती, अकोला.

### शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करण्यात यावे

■ दिवाळी बोनस म्हणून प्रत्येक शेतकऱ्याला किमान २५,००० रुपये देण्यात यावेत. अतिवृष्टी किंवा इतर कारणांमुळे झालेल्या नुकसानीपोटी १ लाख रुपये प्रति हेक्टर (म्हणजेच ४०,००० रुपये प्रति एकर) केवळ लागवड खर्च म्हणून तात्काळ द्यावा.

# पत्रकार भवनासाठी नैनपूर येथील शासकीय जागा देण्याची मागणी

## पत्रकार संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**



देसाईगंज : देसाईगंज तालुक्यात पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार भवन उभारण्याच्या मागणीने जोर धरला आहे. अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक व पत्रकार संघटना, जिल्हा गडचिरोली, तहसील देसाईगंज यांच्या वतीने मौजा नेनपूर येथील भूमापन क्रमांक १७७ व सर्वे क्रमांक १७८ मधील उपलब्ध शासकीय जागा पत्रकार भवनासाठी आरक्षित करून देण्याची मागणी तहसीलदारांकडे करण्यात आली आहे.

देसाईगंज शहरात पत्रकारांसाठी स्वतंत्र कार्यालय किंवा पत्रकार भवन नसल्याने पत्रकारांना बैठका, पत्रकार परिषदा, प्रशिक्षण कार्यक्रम, दस्तऐवजांचे जतन तसेच विविध संघटनात्मक कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी संघटनेने पुढाकार घेत शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

शासकीय जमिनीच्या चौकशीकडे लक्ष तहसीलदार, देसाईगंज यांच्या दिनांक ३ जून २०२६ रोजीच्या पत्रानुसार, मौजा नेनपूर येथील भूमापन क्रमांक १७७ व सर्वे क्रमांक १७८ संदर्भातील शासकीय नजूल जमिनीबाबत चौकशी सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर चौकशी पूर्ण झाल्यानंतर संबंधित जागा शासकीय असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यातील शासकीय जागा उपलब्ध असल्यास, ती पत्रकार भवनासाठी आरक्षित करून देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

नैनपूर येथील उपलब्ध शासकीय जागेची पाहणी करून तिची मालकी व उपलब्धता निश्चित करावी आणि शासनाच्या नियमांनुसार पत्रकार भवनासाठी जागा विनामूल्य अथवा नाममात्र भाडेपट्ट्याने मंजूर करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. आता या मागणीवर तहसील प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे पत्रकार व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

या निवेदन देता वेळा अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक व पत्रकार संघटना, जिल्हा गडचिरोली अध्यक्ष बाबू कुरेशी, प्रल्हाद मेश्राम जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा सचिव तबरेज खान, सुरेश मुटकुतवार, अरुण धुर्वे, तेजझ वाढपाल्लीवार, संदीप भिवंकर, शंकर मूत्यवार, देसाईगंज तालुका अध्यक्ष सत्यवान रामटेके, जिब्राईल शेख तालुका सचिव, फिरोज लालानी उपाध्यक्ष देसाईगंज आणि जाफर शेख इत्यादी उपस्थित होते.

# पीक विविधीकरणातून तेलबिया व कडधान्य लागवडीकडे वळावे : जिल्हाधिकारी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्ह्यात भात पिकाचे प्राबल्य लक्षात घेता शेतकऱ्यांनी पीक विविधीकरण करून तेलबिया व कडधान्य पिकांच्या लागवडीकडे वळावे. पाण्याची उपलब्धता आणि हवामानातील अनिश्चितता विचारात घेऊन हवामानानुकूल शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले.

कृषी विभागाच्या वतीने राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया सन २०२६-२७ अंतर्गत १३ ऑक्टोबर रोजी आरमोरी मार्गावरील सुमानंद सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. तेलबिया पिकांचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविणे तसेच पेरणीपासून काढणीपश्चात व्यवस्थापनापर्यंतचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आली.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रिती हिरळकर यांनी प्रास्ताविकातून रब्बी हंगामातील पिकांचे क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी विभागाच्या नियोजनाची माहिती दिली. शेतकऱ्यांनी करडई, तीळ, जवस, मोहरी व भुईमूग यांसारख्या तेलबिया पिकांची लागवड करून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच कार्यशाळेत जितेंद्र गभने यांनी तेलबिया पिकांची लागवड व शून्य मशागत पद्धतीने मोहरी पेरणीबाबत मार्गदर्शन केले. दिभणा येथील विलास जेंगठे यांनी तेलबिया पिकांचे महत्त्व व जवसाच्या उपयोगांविषयी माहिती दिली. कुरखेडा तालुक्यातील चीचेवाडा येथील अजय मडावी यांनी जैविक व नैसर्गिक शेतीबाबत, तर अहेरी तालुक्यातील महागाव येथील विठोबाजी बोरीले यांनी तीळ व भाजीपाला लागवडीतील अनुभव सांगितले.

शंकरपूर येथील शिवकृपा ऑईल मिलचे संचालक तिलक करकाडे यांनी तेलबिया प्रक्रिया, पूरक व्यवसाय म्हणून तेलगिरणी आणि शेतमालाला योग्य बाजारभाव मिळविण्याबाबत मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्र, सोनापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. किशोर झाडे यांनी धान पिकाची सद्यस्थितीतील काळजी, तेलबिया लागवडीतील खबरदारी आणि उत्पादकता वाढविण्याच्या उपायांची माहिती दिली. यावेळी कार्यशाळेला शेतकरी, कृषी सखी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक, शेतकरी गटांचे सदस्य तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कृषी उपसंचालक मधुगंधा जुलमे यांनी आभार मानले.

## महत्त्वाचे



### कुरखेड्यात सेवा संकल्प अभियानांतर्गत महाराजस्व समाधान शिबिर ; नागरिकांना शासकीय सेवा व योजनांचा लाभ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : सेवा संकल्प अभियानांतर्गत कुरखेडा तहसील कार्यालयात आज 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले. उपविभागीय अधिकारी किरण वागस्कर यांच्या उपस्थितीत झालेल्या या शिबिरात विविध विभागांच्या समन्वयातून नागरिकांना शासकीय सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरालाही नागरिक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराला तहसीलदार शशिकांत जाधव, नायब तहसीलदार वैभव आंबेकर, सत्यनारायण अनमदवार, प्रदीप शिंदे, कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. अमित ठमके आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजिता वाढिवे उपस्थित होते. तसेच महसूल, कृषी, ग्रामपंचायत, वन व आरोग्य विभाग आणि महावितरणचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.
नागरिकांपर्यंत शासकीय सेवा सुलभपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात सहभागी विभागांनी परस्पर समन्वय साधून सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला. विविध विभागांचा एकाच ठिकाणी सहभाग असल्याने नागरिकांना संबंधित सेवांसाठी सोय झाली. सेवा संकल्प अभियानांतर्गत तहसील कार्यालयात रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले.
नागरिकांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. कुरखेडा तहसील प्रशासनाच्या वतीने आयोजित या दोन्ही उपक्रमांतून नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ देण्यासोबतच रक्तदानासाठी लोकसहभागाला चालना देण्यात आली.

### १८ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरपर्यंत मनाई आदेश

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : आगामी सण-उत्सव, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक तसेच संभाव्य आंदोलने व सार्वजनिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविश्यांत पंडा यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात मनाई आदेश जारी केला आहे. हा आदेश १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पासून १ नोव्हेंबर २०२६ रोजी पर्यंत लागू राहील. आदेशानुसार शस्त्रे, शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू, दाहक किंवा स्फोटक पदार्थ तसेच दगड व इतर फेकण्याची साधने बाळगण्यास प्रतिबंध आहे. सभ्यता व नीतिमत्तेला बाधा आणणारी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात आणणारी भाषणे, घोषणा तसेच चित्रे, चिन्हे व फलकांचे प्रदर्शन किंवा प्रसार करण्यासही मनाई आहे. उपविभागीय दंडाधिकारी, कार्यकारी दंडाधिकारी अथवा संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय मिरवणूक काढता येणार नाही. तसेच आदेशाच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा कार्यक्रम आयोजित करण्यास मनाई असल्याचे आदेशात नमूद आहे.



### गडचिरोलीत 'जागर आरोग्याचा : मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमाचे उद्घाटन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून नवरात्रोत्सवाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'जागर आरोग्याचा–मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमाचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली येथे करण्यात आले. यानिमित्त व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, आत्महत्या प्रतिबंध, निरोगी जीवनशैली आणि युवा शक्ती या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहम्मद फैजल, नोडल अधिकारी डॉ. निर्मल चन्ने, जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोहर मडावी, तसेच डॉ. मंगेश हनुमंते, हर्षल पाटेकर, डॉ. ललित मेश्राम, डॉ. हेमलता अंबादे आणि डॉ. शशिकांत ढोबळे उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. अश्विनी डोंगरे आणि डॉ. शिकांत बांबोळे यांनी विविध आरोग्यविषयक मुद्द्यांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्य या विषयांसोबतच आत्महत्या प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडित या विषयांची माहिती देत आरोग्याबाबत सजग दृष्टिकोन विकसित करण्यावर कार्यक्रमात भर देण्यात आला. निरोगी जीवनशैली आणि युवा शक्ती या विषयांवरही यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. युवकांच्या सहभागातून आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने हा संवाद आयोजित करण्यात आला. शारीरिक व मानसिक आरोग्याशी संबंधित विषय एकत्रितपणे मांडण्यात आल्याने विद्यार्थ्यांना आरोग्याच्या विविध पैलूंची माहिती मिळाली. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी आरोग्य शपथ घेतली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'जागर आरोग्याचा–मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमांतर्गत आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली.

# चिखलद-यात गांजाची शेती; आरोपीसह लाखोंचा माल जप्त

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**




अमरावती : जिल्ह्यात 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. याच मोहिमेत चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ येथे गांजाची शेती करणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली.

पोलिसांनी आरोपी देविदास उर्फ धनराज तुळशीराम सतवासे (वय ४८, रा. आनंद नगर, काटकुंभ) याला पकडले. त्याच्याकडून ५ किलो ७१२ ग्रॅम वजनाचा, २ लाख ८५ हजार ६०० रुपये किमतीचा गांजा जप्त करण्यात आला. स्थाकि गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, आरोपीने विक्रीच्या उद्देशाने शेतात गांजा लावला आहे. या माहितीच्या आधारे पथकाने छापा टाकला. चिखलदरा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात पार पडली.

# तीर्थनगरी मार्कंडादेव येथे शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तिमय प्रारंभ; संतोषी माता मंदिरात अखंड ज्योत प्रज्वलित..!

## ऐतिहासिक धार्मिक परंपरेचे जतन करत अखंड ज्योत उत्सवाचा शुभारंभ; डॉ. रवींद्र सुरपाम व जयश्री सुरपाम यांच्याहस्ते पूजाअर्चा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**



मार्कंडादेव : विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थनगरी मार्कंडादेव येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, येथील जय संतोषी माता शक्तिपीठ संस्थानअंतर्गत उभारण्यात आलेल्या जय संतोषी माता मंदिरात अखंड ज्योत उत्सवाचा शुभारंभ मोठ्या श्रद्धेने करण्यात आला. रविवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी घटस्थापनेच्या पवित्र मुहूर्तावर विधिवत पूजा-अर्चा करून अखंड ज्योत प्रज्वलित करण्यात आली. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात आध्यात्मिक चैतन्य निर्माण झाले असून, माता संतोषीच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. शारदीय नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी जय संतोषी माता मंदिरात धार्मिक विधी-विधानानुसार पूजा-अर्चा करण्यात आली. डॉ. रवींद्र सुरपाम आणि जयश्री सुरपाम यांच्या हस्ते पूजाविधी संपन्न झाला. त्यानंतर माता संतोषीची आराधना करून अखंड ज्योत प्रज्वलित करण्यात आली. नऊ दिवस चालणाऱ्या नवरात्रोत्सवात अखंड ज्योतीला विशेष धार्मिक महत्त्व असून, ही ज्योत श्रद्धा, भक्ती, सकारात्मकता आणि मंगलतेचे प्रतीक मानली जाते. भाविक माता संतोषीच्या चरणी नतमस्तक होऊन आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य, शांती आणि भरभराटीसाठी प्रार्थना करीत आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात वसलेली मार्कंडादेव ही प्राचीन धार्मिक वारसा आणि तीर्थपरंपरेसाठी परिचित नगरी आहे. येथील ऐतिहासिक मार्कंडेश्वर मंदिरामुळे या क्षेत्राला विदर्भाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात विशेष स्थान प्राप्त झाले आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या धार्मिक परंपरा, उत्सव आणि पूजाविधी यांच्या माध्यमातून या तीर्थक्षेत्राची ओळख अधिक दृढ झाली आहे.

शारदीय नवरात्रोत्सव हा भारतीय संस्कृतीतील शक्तिउपासनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. या काळात देवीच्या विविध रूपांची आराधना केली जाते. मार्कंडादेव येथील जय संतोषी माता मंदिरात अखंड ज्योत प्रज्वलित करून नवरात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा भक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक ठरत आहे. अशा धार्मिक उपक्रमांमुळे स्थानिक संस्कृती, अध्यात्म आणि सामाजिक एकोपा यांना चालना मिळते. ऐतिहासिक तीर्थनगरीच्या धार्मिक वातावरणात या उत्सवामुळे आणखी भर पडली आहे. जय संतोषी माता शक्तिपीठ संस्थानच्या मार्गदर्शनाखाली आयोजन संस्थानच्या मार्गदर्शनाखाली या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात मंदिरात दर्शन आणि पूजाअर्चेसाठी भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. माता संतोषीच्या दर्शनासोबतच अखंड ज्योतीचे दर्शन घेऊन भक्त आपल्या मनोकामना व्यक्त करीत आहेत. श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा होणारा हा उत्सव भाविकांना धार्मिक परंपरांशी जोडण्याचे कार्य करीत आहे. या कार्यक्रमाला जय संतोषी माता शक्तिपीठ संस्थानचे मठाधिपती आचार्य संतोष सुरपाम, छबिलदास सुरपाम, अलका सुरपाम, संस्थानच्या उपाध्यक्षा रत्नादेवी गेडाम, कोषाध्यक्ष वर्षा भांजीपाले, सदस्य मंजुला बेलादी, देवानंद सुरपाम, कौशल्या जुनघरे आणि मारोती जुनघरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग नोंदवून माता संतोषीचे दर्शन घेतले.

### नवरात्रोत्सवामुळे परिसरात भक्तिमय वातावरण..!

■ शारदीय नवरात्रोत्सवाच्या प्रारंभी प्रज्वलित करण्यात आलेली अखंड ज्योत ही श्रद्धा आणि भक्तीचा जागर अधोरेखित करीत आहे. तीर्थनगरी मार्कंडादेव येथील धार्मिक परंपरा जपत आयोजित करण्यात आलेला हा उत्सव भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरत आहे. ऐतिहासिक धार्मिक वारसा, देवीची उपासना आणि सामूहिक श्रद्धा यांचा संगम या उत्सवातून अनुभवायला मिळत असून, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने जय संतोषी माता मंदिरात सुरू झालेला अखंड ज्योत उत्सव धार्मिक परंपरांचे संवर्धन करण्यासोबतच भाविकांच्या श्रद्धेला नवी ऊर्जा देणारा ठरत आहे. तीर्थनगरी मार्कंडादेवच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात या उत्सवाने आणखी एक महत्त्वपूर्ण भर घातली आहे.